RNI No. - MAHMAR 2023/84526

विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१५९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.१८ जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

महाविद्यालयांतील कॅन्टीनमध्ये समोसे, कचोरीवर बंदी

सूचनेंतर्गत नूडल्स, ब्रेड पकोडाही आरोग्यासाठी अपायकारक

दि. १८ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली

देशातील सर्व महाविद्यालयांच्या कॅन्टीनमध्ये समोसा, कचोरी, नूडल्स, ब्रेड पकोडा यांसारखे खाद्यपदार्थ इथून पुढे उपलब्ध होणार नाहीत. विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतीच विद्यापीठे आणि पदवी महाविद्यालयांच्या कॅन्टीनमध्ये उपलब्ध खाद्यपदार्थांबाबत नोटीस जारी केली आहे. याद्वारे आरोग्याला अपायकारक

असलेल्या खाद्यपदार्थांची विक्री बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यूजीसीकडून मार्गदर्शक सूचना जारी

सूचनेंतर्गत नूडल्स, ब्रेड पकोडाही आरोग्यासाठी अपायकारक आहेत त्यामुळे महाविद्यालयातील कॅन्टीनमध्ये फक्त सकस आहार दिला जाईल. उच्च शिक्षण संस्थांना याआधीही १० नोव्हेंबर २०१६ आणि २१ ऑगस्ट २०१८ रोजी असा सल्ला देण्यात आला होता, पण त्याचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. आता देण्यात आलेली सूचना संस्थांनी इशारा समजावी. सूचनेबरहुकूम अंमलबजावणी केल्याने आपण विविध आजारांना आळा घालू शकू, असेही विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट केले आहे.

उत्तर प्रदेशमध्ये मोठा रेल्वे अपघात, दिब्रुगड एक्स्प्रेसचे १० डबे रुळावरून घसरले, बचाव कार्य सुरू

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक गोंडा उत्तरप्रदेश

उत्तर प्रदेशमधील गोंडा येथे गुरवारी दुपारी एक मोठा रेल्वे अपघात झाला आहे. येथे चंडीगड येथून आसामला जाणाऱ्या दिब्रुगड एक्स्प्रेसचे १० डबे रुळावरून घसरले आहेत. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर रेल्वेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. तसेच बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. अपघातग्रस्त डब्यांमधून प्रवाशांना बाहेर काढण्याचं काम सुरू करण्यात आलं आहे. मात्र

या अपघातामुळे या मार्गावरील रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार चंडीगड येथून दिब्रुगडला जाणारी ट्रेन क्रमांक १५९०४ दिब्रुगड एक्स्प्रेस ही आज दुपारी २ च्या सुमारास गोंडा जंक्शन येथून पुढच्या प्रवासाला निघाली होती. मात्र काही वेळातच दुपारी २.३० च्या सुमारास गोंडापासून २० किमी अंतरावर या ट्रेनला अपघात झाला. या अपघातात ट्रेनचे दोन डबे रुळावरून पूर्णपणे घसरले. तर इतर काही डबेही अपघातग्रस्त झाले. अपघातग्रस्त डब्यांमधून प्रवाशी जीव मुठीत धरून बाहेर पडले.

मोदी, शाह, राजनाथ...१ तास चालली सीसीएसची बैठक, दहशतवाद्यांवर मोठा हल्ला करण्याची तयारी

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली

राजधानी दिल्लीत आज कॅबिनेट सुरक्षा व्यवहार समिती, म्हणजेच उउड ची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शाह,संरक्षण मंत्री राजनाथ सिंह अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एक तास चाललेल्या या बैठकीत जम्मूमधील वाढत्या दहशतवादी हल्ले आणि उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली.

काश्मीर खोऱ्यात पुन्हा एकदा दहशतवादी सक्रिय झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरच्या विविध भागात दहशतवादी हल्ले वाढले असून, यामध्ये अनेक जवानही शहीद झाले आहेत. आता सरकार या दहशतवाद्यांवर मोठा हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. काश्मीर खोऱ्यातील हल्ल्यांपैकी डोडाचे प्रकरण ताजे आहे. येथे सोमवारी(दि. २६) सायंकाळी झालेल्या चकमकीत पाच जवान शहीद झाले होते.आजही सकाळी(दि.१८) जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातील कास्तीगड भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, डोडामधील कास्तीगड भागात अजूनही चकमक सुरू आहे. या चकमकीत लष्कराचा एक जवानही जखमी झाला आहे. दरम्यान, डोडा येथे महिनाभरात दहशतवाद्यांशी चकमक होण्याची ही सहावी घटना आहे.

डोडा चकमकीत पाच जवान शहीद

सोमवारी संध्याकाळी झालेल्या चकमकीत एका अधिकाऱ्यासह ५ जवानांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. राष्ट्रीय रायफल्स आणि जम्मू-काश्मीर पोलिसांचे डोडा शहरापासून ५५ किमी अंतरावर असलेल्या जंगलात मोहिम सुरू होती. यावेळी दहशतवाद्यांनी हल्ला केला, सैन्याच्या जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिले. दहशतवाद्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, तर सैनिकांनीही घनदाट जंगलातून त्यांचा पाठलाग केला. त्यानंतर रात्री ९ च्या सुमारास जंगलात आणखी एक चकमक झाली. या चकमकीत पाच जवान गंभीर जखमी झाले, ज्यांचा उपचारादरम्यान मंगळवारी सकाळी मृत्यू झाला. शहीद झालेल्या जवानांमध्ये लष्कराचा एक अधिकारी, तीन जवान आणि जम्मू-काश्मीर पोलिसांचा समावेश आहे.

'नीट' परीक्षा वादावर आता सोमवारी होणार फैसला

पेपरफुटी व्यापक प्रमाणावर झाली असेल तरच फेरपरीक्षा – सरन्यायाधीश चंद्रचूड

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली

वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतल्या जाणार्या 'नीट' युजी - २४ परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर आज (दि.१८) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. बिहार पोलिसांनी आपल्या अहवालाची प्रत सादर करावी तसेच एनटीएने 'नीट' युजी - २४परीक्षेचे निकाल त्यांच्या वेबसाइटवर शहरनिहाय आणि केंद्रनिहाय प्रकाशित करावे, असे निर्देश देत या प्रकरणी पुढील सुनावणी सोमवार, २२ जुलै रोजी होईल, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. दरम्यान, आजच्या सुनावणीत पेपरफुटी व्यापक प्रमाणावर झाली असेल तरच फेरपरीक्षा होईल, असा पुन्नरुच्चार सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केला.

परीक्षेमध्ये झालेले गैरप्रकार हे स्थानिक स्वरुपाचे आहेत, असा दावा करत पुन्हा नीट परीक्षा घेण्याच्या मागणीला केंद्र सरकारसह नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने ८ जुलै रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान विरोध केला होता. यावेळी नीट परीक्षेतील गैरप्रकाराबाबत केंद्र सरकार आणि छढ- ने १० जुलैपर्यंत शपथपत्र दाखल करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. एनटीएने १७ जुलै रोजी न्यायालयात सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, परीक्षेत पद्धतशीर अनियमितता असल्याचा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्णपणे चुकीचा आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सीबीआयने या प्रकरणी न्यायालयात तपास अहवाल सादर करायचा होता. त्याची एक प्रत आम्हाला मिळावी, अशी मागणी मुख्य याचिकाकर्त्याचे ज्येष्ठ वकील नरेंद्र हुड्डा यांनी केली. यावर सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणी सीबीआयने तपासातील तपशील उघड केला तर तपासात अडथळा येईल.

मनोरमा खेडकर यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक पुणे

आयएएस पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांना आज महाडमधून पोलिसांनी अटक केली आहे. महाडमधील एका हॉटेलमध्ये त्या लपून बसल्या होत्या.

शेतकऱ्याला धमकावल्याप्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर त्या फरार होते. मात्र आज महाडमधील एका हॉटेलमधून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

शेतकऱ्याला धमकावल्याप्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर शेतकऱ्याला धमकावतानाचा व्हिडिओ व्हायरल होत होता. अटकेनंतर आज त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.पुणे ग्रामीण पोलिसांनी न्यायालयाकडे या प्रकरणात सात दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र न्यायालयाने मनोरमा खेडकर यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

पोलिसांना सदर व्हिडीओतील पिस्तुल शोधायचे आहे आणि अंगरक्षकांना ताब्यात घ्यायचे असल्याने पोलिसांनी या प्रकरणात सात दिवसांची कोठडी मागितली होती मात्र न्यायालयाने तीन दिवसांची कोठडी दिली.

बैठकीला दांडी! नितीन देशमुखांनी तहसीलदार अन् कृषी अधिकाऱ्यांना कोंडूनच घेतलं

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अकोला

अकोला जिल्ह्यातील बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी विमा कंपन्यांच्या तक्रारीविरोधात नगरपालिकेत सर्व अधिकाऱ्यांसह विमा कंपन्यांची बैठक बोलावली. या बैठकीला तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांनी दांडी मारल्याने संतप्त देशमुखांनी तहसीलदारांसह कृषी अधिकाऱ्यांना कोंडूनच घेतलं. जोवर शेतकऱ्यांचा विमा प्रश्न सुटत नाही तोवर कोणालाही आतून सोडणार नसल्याची भूमिका देशमुख यांनी घेतलीयं.

मागील अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळत नसल्याचे प्रकार समोर आले आहेत. तर अनेक शेतकऱ्यांना काही तांत्रिक अडचणी येत आहेत. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आमदार नितीन देशमुखांनी बैठकीचं आयोजन केलं होतं. ही बैठक नगरपालिकेत होती.या बैठकीसाठी नगरपालिकेत सर्व अधिकारी आणि विमा कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांना बोलावण्यात आलं होतं. मात्र विमा कंपन्यांचे आणि कृषी विभागाचे अधिकारी या बैठकीसाठी आलेच नाहीत. त्यामुळे नितीन देशमुख प्रचंड संतापले. त्यांनी थेट तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांना कोंडून ठेवलं.

१२ नक्षलवाद्यांचा खात्मा; गडचिरोली पोलिसांना ५१ लाखांचं बक्षीस, फडणवीसांची घोषणा

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर नक्षलवादी आणि पोलिसांत झालेल्या चकमकीत पोलिसांनी (कमांडो जवान) १२ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. पोलिसांच्या या कारवाईची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५१ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. गडचिरोलीत आज

सकाळी १० वाजता एक ऑपरेशन सुरू करण्यात आले. वांडोली गावातील छत्तीसगड सीमेजवळ १२-१५ माओवादी तळ ठोकून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर डीवाय एसपींच्या नेतृत्वाखाली 7 C60 पथक मोहिमेवर पाठवण्यात आले होते.

लोकसभा निवडणुकीच्या आधीही गडचिरोलीतील कोरचोली आणि गांगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिस आणि नक्षलवाद्यांत चकमक झाली. पोलिस आणि नक्षलवाद्यांच्या या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले. वांडोली गावाजवळ दुपारच्या सुमारास जोरदार चकमक सुरू झाली. संध्याकाळी उशिरापर्यंत ६ तासांहून अधिक काळ दोन्ही बाजून गोळीबार सुरू होता. दरम्यान, घटनेनंतर आतापर्यंत १२ माओवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. तर 3 -K47, 2 INSAS, १ कार्बाइन, १ SLR यासह ७ ऑटोमोटिव्ह शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

शेवटी ते वारीला आलेच नाहीत, रामकृष्ण हरीचा जयघोष रुचलाच नसता; भाजपाची राहुल गांधी अन् पवारांवर टीका

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई

यंदाच्या आषाढी वारीत शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवा आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी वारीत सहभागी होणार असल्याचं बोललं जात होतं. मात्र, हे दोघेही वारीत दिसून न आल्यामुळे भाजपने या दोन्ही नेत्यांवर सडकून टीका केली आहे. शेवटी ते वारीला आलेच नाहीत. वारीतल्या भगव्या पताक्याचा त्यांनी इतका द्वेष का, असा सवाल भाजपने केला.

भाजपने ट्विटवर एक पोस्ट लिहिली. राहुल गांधी वारीला येणार शेवटी ते वारीला आलेच नाहीतवारीतल्या भगव्या पताक्याचा राहुल गांधी आणि शरद पवारांना इतका द्वेष का?, असा सवाल भापजने या पोस्टमध्ये केला. पुढं लिहिलं की, शरद पवार आणि राहुल गांधी यांचे जे काही थोडे खासदार अपप्रचारामुळे निवडून आले आणि विशेष व्होट बँक नाराज होईल या भीतीने दोघांनी वारीत येण्याचं टाळलं. यापूर्वी विठुरायाची मूर्ती नाकारलेल्या राहुल गांधींने वारीचे आमंत्रण स्वीकारून देखीलही वारीत सहभागी झाला नाही, त्यामुळे त्यांने पुन्हा एकदा वारकऱ्यांचा, परंपरेचा अपमान केला आहे, अशी एकेरी टीका राहुल गांधींवर केली.हिंदू धर्म ज्यांचा चेष्टेचा विषय असतो, अशा शरद पवारांना यंदा वारी आठवली. मात्र, आपल्या सवयीप्रमाणे त्यांनी शेवटी काढता पाय घेतला. शेवटी आमचे तुकोबाराय म्हणालेच आहेत की येऱ्यागबाळ्याचे काम नोहे, असा टोला भाजपने पवारांना लगावला.

संपादकीय .....

भव्य-दिव्य सोहळा

मंडळी, गेले पंधरा दिवस झाले आपण अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या विवाह सोहळ्याच्या बातम्या डोळे भरून पाहत आहोत. अनंत अंबानी हे आशिया खंडातील नव्हे, तर जगातील एक प्रमुख श्रीमंत गृहस्थ असलेले मुकेश अंबानी यांचे चिरंजीव आहेत. आता लग्न झाले आहे; परंतु त्यापूर्वी प्री-वेडिंगही इतकेच भव्य-दिव्य झालेले होते. जगातील कित्येक राष्ट्रांचे प्रमुख विमाने घेऊन थेट या विवाह सोहळ्याला आलेले होते. भारतातील सर्वच राजकीय पक्षांचे मोठे नेते, चित्रपट, कला, क्रीडा, संगीत या क्षेत्रांमधील सगळे सेलिब्रिटीज आणि चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदीही या सोहळ्याला हजर होते. मुकेश अंबानी यांच्या एकूण भव्य-दिव्य संपत्तीचा सोहळा आपल्या देशाने डोळे भरून पाहिला. या सोहळ्याची चर्चा संपूर्ण जगात झाली असे मीडियातील बातम्यांमधून लक्षात आले आहे. अगदी शेजारी असलेला दुश्मन देश म्हणजे पाकिस्तानातूनही या विवाह सोहळ्यावर खूप प्रतिक्रिया आल्या आहेत. अंबानींचा एकूण टर्नओव्हर आणि संपत्ती ही पाकिस्तानच्या अर्थसंकल्पापेक्षा मोठी आहे असे लक्षात आल्यानंतर त्या देशातील जनतेच्या मनामध्ये निराशा निर्माण झाल्याची वार्ता आली.

आपण सर्वसामान्य लोकांनीही हा भव्य-दिव्य सोहळा घरी बसून टीव्हीवर साजरा केला. जेमतेम उत्पन्न असणारे आपल्यासारखे लोक महिना अखेरीला गोडेतेल संपले, तर काय करायचे हे विसरून जाऊन भान हरपून हा सोहळा पाहत राहिलो. अनंत अंबानी यांचे घड्याळ ५४ कोटी रुपयांचे होते म्हणे! विवाहास हजेरी लावलेल्या प्रत्येकाला किमान दोन कोटी रुपयांचे घड्याळ रिटर्न गिफ्ट म्हणून मिळाले होते. कित्येक लोकांसाठी चार्टर म्हणजे स्वतंत्र विमाने बुक करून दिलेली होती. धनिक घरची बाळे या लग्नामध्ये नाचणे कर्तव्य समजून बेधुंद नृत्य करत होती. राजकीय पक्षांशी संबंधित काही धनिक मुले नाचत असलेले व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाले होते. ज्या पाश्चात्त्य कलाकारांना आपण केवळ टीव्हीवर पाहतो किंवा त्यांच्याबद्दल ऐकतो ते लोक अंबानींच्या घरच्या कार्यात घरचे लोक असल्यासारखे नाचत होते. आपणही नाही का आपल्या मगदुराप्रमाणे मुलाबाळांच्या लग्नात खर्च करीत असतो, तसेच त्यांचेही होते हे भारतातील सामान्य जनतेने मान्य केले आहे. त्याचे पैसे तो खर्च करेल तर त्यात वावगे असे काय आहे? नेमके याच वेळी जिओ रिचार्जचे दर वाढले. त्यामुळे देशातील प्रत्येक जिओच्या ग्राहकाला अंबानींना आहेर केल्याचे सुख मिळाले. खरं तर, जिओ किंवा तत्सम व्यापार हे अंबानींसाठी त्यांच्या साम-ाज्याचा एक किंचितसा भाग आहेत. आशिया खंडातील किंवा जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये ज्या व्यक्तीचे नाव येते त्याचा काही एकच कारभार नसतो. त्यांचे अनेक व्यवसाय असतात. त्यापैकी एक जिओ मोबाईल नेटवर्क आहे.आजकाल आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या लग्नात येवला येथे जाऊन पैठणी खरेदी करणे हे सामान्य मध्यमवर्गीयांसाठी नेहमीचे झाले आहे. अंबानी यांच्या वधूसाठी येवला येथील पैठणी खरेदी करण्यात आली होती. ही पैठणी तयार करण्यासाठी सुमारे ५० कारागीर सहा महिने झटत होते. अंबानीच्या सूनबाईची पैठणी ज्या गावची आहे त्याच गावातून आपणही आपल्या सूनबाईसाठी पैठणी आणली होती, हे लक्षात आल्यामुळे आपल्या राज्यातील अनेक लोक हरखून गेले आहेत. अंबानींच्या विवाह सोहळ्यात आणि आपल्या सर्वसामान्य विवाह सोहळ्यामध्ये हाच एक तो काय कॉमन धागा होता बहुतेक!

सरकारी बंगल्यांच्या आवारातही वृक्षलागवड हवी

वन धोरणानुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के भौगोलिक क्षेत्र वन वृक्षाच्छादित असणे गरजेचे असताना राज्यात हे प्रमाण साधारण २० टक्के आहे. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वातील कलम ४८ अ नुसार नैसर्गिक संसाधनाच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली आहे.या कार्यात नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आणि वनाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. केवळ वृक्षारोपण न करता वृक्ष संवर्धनाच्या प्रयत्नांकडे देखील विशेष लक्ष देण्यात येत असून या सर्व कार्यात शालेय विद्यार्थ्यांपासून स्वयंसेवी संस्थांपर्यंत सर्व घटकांना सहभागी करून घेतल्याने वृक्षारोपणाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.शासकीय अधिकारी देखील वृक्षारोपणासाठी आवाहन करतात, प्रोत्साहन देतात. पण, याच बड्या अधिकारी वर्गाच्या बंगल्यातील आवारात वृक्षारोपण का केले जात नाही, हा प्रश्न पडतो. अधिका-यांनी त्यांच्या घराच्या आवारातील जागेचे योग्य नियोजन करून परंपरागत वृक्षांची लागवड केल्यास, शहरातील वृक्ष आच्छादन वाढण्यास मदतच होणार आहे. अधिका-यांनी याकामी पुढाकार घेतला पाहिजे.पर्यावरणाचे बिघडत असलेले संतुलन, वाढते तापमान, घटते पर्जन्यमान, जमिनीची होत असलेली धूप, खोलवर जात असलेली भूजल पातळी हे घटत चाललेली झाडांची संख्या तसेच कमी होत असलेले वनआच्छादन यांचेच दुष्परिणाम आहेत. अमरावती शहरात यंदा उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानाचा फटका लोकांना बसला.पर्यावरण असंतुलनाचे सर्व दुष्परिणाम कमी करावयाचे असतील तर वृक्ष लागवड आणि त्यांचे संगोपन हाच परिणामकारण उपाय आहे. वन जमिनी, शासकीय पडीक जमिनी, रस्त्याच्या दुतर्फा यावरच झाडे लावून चालणार नाही तर सरकारी बंगल्यांच्या आवारात सुद्धा वृक्ष लागवड केल्यास झाडांची संख्या वाढून त्याचे अपेक्षित परिणाम दिसू लागतील. प्रत्येकाने वृक्ष लागवड व त्याचे किमान पाच वर्षे संगोपन हे आपले कर्तव्य असल्याचे समजून या कामास हातभार लावला तरच वृक्ष लागवडीची शासनाची मोहीम यशस्वी होऊ शकेल.शहरात सध्या ९४९ 'हेरिटेज' (वारसा) वृक्ष आहेत. ज्या वृक्षांचे वय हे किमान ५० वर्षांपेक्षा जास्त आहे. अशा शहरातील वृक्षांचा 'हेरिटेज' श्रेणीत समावेश करण्यात आला आहे. अशा वृक्षांचे संरक्षण व जतन करण्यासाठी त्यांना 'हेरिटेज' गटात स्थान देण्यात आले आहे.या गणनेत सर्वाधिक ४७० कडुनिंबाचे, २१० पिंपळाचे, १२० वडाचे, ७० चिंचेचे, १७ उंबराचे तर १० सिसमचे 'हेरिटेज' वृक्ष आढळले आहेत.

नितीन देशमुख,
माजी नगरसेवक,
अमरावती
(९०९०९८९८९७)

मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षांची कत्तल रोखण्यासोबतच त्यांच्या संरक्षणासाठी शासनाने गणना करण्यासोबत ५० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या झाडांची नोंद ठेवण्याचे आदेश दिले. हे वारसा वृक्ष सांभाळण्याची सर्वांची जबाबदारी आहे. पण, अधिकारी वर्गाने स्वत: वृक्षसंगोपनाची जबाबदारी स्वीकारून शहरातील नागरिकांना वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहित केले पाहिजे.पूर्वी या वृक्षारोपण कार्यक्रमामुळे सुबाभूळ, गुलमोहोर, निलगिरी अशी परदेशी झाडे भारतात लावली गेली. या झाडांची आपल्या स्थानिक पक्ष्यांना सवय नसल्याने या झाडांचा अथवा या झाडांची पाने, फुले, फळे यांचा वापर भारतीय पक्षी करत नाहीत. वर्षभर आपण खात असलेल्या विविध फळांच्या बिया साठवून ठेवल्यास त्याचा उपयोग देखील वृक्षांची रोपे तयार करण्यासाठी होऊ शकतो.सर्व सजीवांना जिवंत राहण्यासाठी आवश्यक आहे. ते म्हणजे प्राणवायू. प्राणवायू श्वास घेऊन आपण कार्बन डायऑक्साइड बाहेर टाकतो. हाच कार्बन डायऑक्साइड वृक्ष शोषून घेतात व आपणाला आवश्यक असणारा प्राणवायू ते सोडतात. या सर्व गोष्टी केव्हा सहज आपल्याला मिळतील तर त्या वृक्षारोपण आतापासूनच केले तर?

मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव, असे करा नियंत्रण

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक

विदर्भातील अनेक भागात मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. सध्या विदर्भातील काही जिल्ह्यात प्रामुख्याने रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजातींचा उद्रेक आढळून आला आहे.

प्रादुर्भावाची लक्षणे

कीड पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकीरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी लाल्या म्हणुन ओळखतात. कोळीचा प्रादुर्भाव वर्षभर असला तरी फळ धारणेपासून ते फळ काढणीपर्यंत आणि ऑगस्ट ते ऑक्टोंबर दरम्यान जास्त असतो.

या कीडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमीत आकाराची

फळे तयार होतात. प्रादुर्भाव ग्रसीत फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो. विदर्भातील अनेक भागात मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. कोळी ही अष्टपदी वर्गातील महत्वाची कीड आहे. सध्या विदर्भातील काही जिल्ह्यात प्रामुख्याने रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजातींचा उद्रेक आढळून आला आहे.

व्यवस्थापन :

प्रतिबंधात्मक उपाय :

उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो.

सेंद्रीय उपाय :

अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळुन फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी.

रासायनिक उपाय :

कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्लुपी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.

'डायबेटिक फूट'ने ग्रस्त आहात?

शरीराच्या विविध अवयवांवर मधुमेहाचे अत्यंत प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. यामध्ये डोळे, यकृत, मूत्रपिंड या बरोबरच पायांसाठीही मधुमेह हा काळजी वाढवणारा ठरतो. वैद्यकीय परिभाषेत याला 'डायबेटिक फूट' असे म्हटले जाते.

आजारांचे प्रमाण वाढत आहे

संपूर्ण जगभरामध्ये जीवनशैलीमुळे होणार्या आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. यामध्ये मधुमेहाच्या व्याधीने ग्रस्त असणार्यांची संख्या मोठी आहे. सद्यस्थितीत भारतामध्ये १० कोटींहून अधिक मधुमेहाचे रुग्ण आहेत. २०१९ मध्ये ही संख्या सात कोटी होती. म्हणजेच, केवळ चार वर्षांत सुमारे ४ कोटी भारतीयांना मधुमेहाची लागण झाली असल्याची माहिती इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च म्हणजेच आयसीएमआरच्या गतवर्षीच्या अहवालातून समोर आली होती. चार वर्षांत ४४ टक्क्यांनी मधुमेहींची संख्या वाढणे ही अर्थातच अत्यंत चिंताजनक बाब आहे.

मधुमेह काळजी वाढवणारा

याचे कारण शरीराच्या विविध अवयवांवर मधुमेहाचे अत्यंत प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. यामध्ये डोळे, यकृत, मूत्रपिंड याबरोबरच पायांसाठीही मधुमेह हा काळजी वाढवणारा ठरतो. वैद्यकीय परिभाषेत याला 'डायबेटिक फूट' असे म्हटले जाते. याविषयी अनेकांना माहिती नसते. कारण सुरुवातीला याची लक्षणे दिसत असली, तरी त्याचे रुग्णाला आकलनच होत नाही. पायांना असाधारण सूज येणे, जळजळ होणे, लालसरपणा जाणवणे, त्वचेचा रंग बदलणे, पाय सुन्न होणे आणि मुंग्या येणे, चालताना वेदना होणे, फोड येणे अशी या व्याधीमध्ये दिसू शकतात.

ऑक्सिजनचा पुरवठा कमी- मुळात मधुमेही व्यक्तींमध्ये रक्तवाहिन्या कडक आणि अरुंद होतात. रक्तशर्करेची पातळी दीर्घकाळ वाढलेलीच राहिली की, ही अरुंदीकरणाची प्रक्रिया अधिक प्रमाणात होते. याचा परिणाम हृदयाकडून शरीरातील अन्य अवयवांना होणार्या रक्तपुरवठ्यावर होतो आणि तो कमी होत जातो. रक्ताबरोबरच या अवयवांना ऑक्सिजनचा पुरवठाही कमी होतो.

गँगरीन होते- यामुळे संवेदना कमी होत जातात. विशेषत: हृदयापासून लांब असणार्या तळपायाबाबत ही स्थिती अधिक धोकादायक ठरते. कारण, अशा स्थितीत पोहोचलेल्या रुग्णाना तळपायाला टोचलेले, लागलेले, खरचटलेले समजतच नाही. केअरटेकरच्या किंवा कुटुंबातील कुणाच्या लक्षात आले, तर तत्काळ योग्य उपचार करून ही जखम नियंत्रणात आणण्यासाठी उपचार केले जातात. अन्यथा बहुतांश जणांबाबत ही जखम चिघळत जाऊन हाडापर्यंत संसर्ग पोहोचतो. पुढे जाऊन हाडे निकामी होतात. वैद्यकीय शब्दांमध्ये याला गँगरीन म्हटले जाते.

जखम झाली तर बरी होण्याची शक्यता कमी- गँगरीनची स्थिती ही रुग्णासाठी अत्यंत घातक असते. कारण, यामध्ये पायाला झालेली जखम बरी होण्याची शक्यताच मावळून जाते. अशावेळी पाय कापून टाकण्याशिवाय पर्याय उरत नाही. विशेषत: वयोवृद्ध मधुमेही रुग्णांमध्ये हे प्रकार अधिक प्रमाणात दिसतात. पाय कापून टाकणे हा त्यांच्यासाठी मानसिक आघात असतो.

एलिझारोव्ह हे रशियन तंत्रज्ञान

गेल्या काही वर्षांमध्ये एलिझारोव्ह या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पाय कापण्याची आपत्ती टाळता येणे शक्य झाले आहे. एलिझारोव्ह हे प्रामुख्याने रशियन तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तुलनेने कमी खर्च येण्याबरोबरच या शस्त्रक्रियेद्वारे उपचार केलेला रुग्ण काही तासांमध्ये रुग्णालयातून घरी जाऊ शकतो आणि अगदी काही दिवसांतच तो पूर्ववत चालतं-फिरतं आयुष्य जगू शकतो.

पांडुरंगाच्या पालखीपदयात्रेने दुमदुमली गुरुकुंजनगरी

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक गुरुकुंज मोझरी-आषाढी एकादशी निमित्य आयोजित भव्य पालखी पदयात्रेतील टाळमृदुंगा च्या निनादाने आज गुरुकुंजनगरी दुमदुमून गेली.सर्वच भक्तांना पंढरपूरची वारी घडून येतेच असे नाही यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गुरुकुंज आश्रम येथे रामकृष्ण हरी मंदिराची स्थापना केली होती.याचा महिमा महाराज भजनात शब्दबद्ध करतांना म्हणतात

पंढरपुरची वारी करण्या, लांब लांब का जाता ।

इथेच येउनि सदा बसावे, वाटतसे भगवंता ।चला चला गुरुकुंज बघाया.आज सकाळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या

महासमधी पासून दासटेकडी पर्यंत गावोगावीच्या पालख्यांनी व श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयाच्या विद्यार्थ्यांनी पालखीपदयात्रेत सहभाग घेतला.महिलांनी फेर धरून भक्तिरसात फुगडीचा आनंद घेतला.विठ्ठल रुक्मिणी संत नामदेव,संत तुकाराम यांचे पात्र बालगोपांलानी साकारले. रामकृष्ण हरी मंदिराचे विश्वस्तप्रमुख विलास साबळे,श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे,सरचिटणीस जनार्दन बोथे,डॉ राजाराम बोथे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.गुरुदेवसेवा मंडळाच्या महिला कीर्तनकार पौर्णिमा सवाई यांच्या किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.

भरपावसाळ्यातही मेळघाटातील नऊ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

भूजलपातळीत वाढ न झाल्याने टंचाई कायम

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा- जिल्ह्यात १ जून ते ११ जुलै या कालावधीत आतापर्यंत २२४ मिमी पाऊस झाला आहे. मात्र, विखुरलेल्या स्वरूपातील या पावसाने टंचाईग्रस्त गावांतील भूगर्भातील जलपातळीत वाढ झालेली नाही. त्यामुळे मेळघाटातील नऊ गावांतील ६ हजार २८३ नागरिकांची तहान अद्यापही टँकरच्या पाण्यावरच भागविली जात आहे. टँकरग्रस्त सर्व नऊ गावे चिखलदरा तालुक्यातील आहेत. उन्हाळ्यात पाण्याचे स्रोत आटत असल्याने निर्माण होणाऱ्या तीव्र पाणीटंचाईवर तोडगा म्हणून जिल्हा प्रशासनाकडून टँकरची व्यवस्था करण्यात येते. यंदा मार्च महिन्यापासून टँकर सुरू करण्यात येतात. पावसाळ्यात ती साधारणतः बंद केली जातात. यंदा अजूनही नऊ गावांमध्ये टँकर सुरूच आहेत. ही सर्व गावे मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील आहेत. यंदा १ जून ते ११ जुलै या कालावधीत जिल्ह्यात सरासरी २२४ मिमी पाऊस झाला असून, सामान्य पर्जन्यमानाच्या तुलनेत त्याचे प्रमाण ९२ टक्के आहे. तथापि, आतापर्यंत झालेला पाऊस विखुरलेल्या स्वरूपाचा असल्याने त्याचे वितरण, सर्व भागात संतुलित प्रमाणात चिखलदरा तालुक्यातील नऊ गावांना पाण्याचे टँकर सुरू आहेत. चिखलदरा तालुक्यात दरवर्षी पावसाची सरासरी अधिक राहते.

यंदा आतापर्यंत या तालुक्यात २९९ मिमी पाऊस झाला असून, सामान्य पर्जन्यमानाच्या तुलनेत त्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. आतापर्यंत झालेल्या पावसाने भूगर्भातील पाणीपातळीत वाढ झालेली नाही. त्यामुळे पाण्याचे नैसर्गिक स्रोत जिवंत झालेले नाहीत. परिणामी पाण्याची टंचाई कायम आहे, असे प्रशासकीय यंत्रणेकडून सांगण्यात आले.या नऊही गावांतील पाण्याचे स्रोत जिवंत झालेले नाहीत. त्यामुळे तब्बल ६ हजार २८३ नागरिकांना टँकरच्या पाण्यावरच तहान भागवावी लागत आहे. भूगर्भातील पाणीपातळी वाढून स्रोत जिवंत होण्यासाठी अजून महिना लागणार आहे. पावसाच्या सरासरीचे प्रमाण वाढण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले.

'या' गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा

टँकरग्रस्त गावांमध्ये मोथा, खडीमल, धरमडोह, आकी, बहादरपूर, गौलखेडा बाजार, गवळीढाणा (कोरडा), स्कूलढाणा (कोरडा), कालापांढरी (कोरडा) या गावांचा समावेश आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विधानसभेसाठी काँग्रेसची तयारी सुरू

अमरावती मधून डॉ.सुनील देशमुख,विलास इंगोले,अलीम पटेल यांचे अर्ज

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा मोठा विजय झाला. महाविकास आघाडीतील काँग्रेसने १३ जागा जिकून राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून मान्यता मिळविली. लोकसभेतील या यशापाठोपाठ आगामी विधानसभा निवडणूक जिकण्यासाठी काँग्रसने आतापासूनच कंबर कसली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यास सुरवात केली आहे.या अनुषंगाने इच्छुक उमेदवार म्हणून अमरावतीमधून माजी पालकमंत्रीडॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले आणि अलिम पटेल यांनी

अर्ज भरल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे विहित नमुन्यातील अर्ज, सर्व माहिती आणि पक्षनिधीसह १० ऑगस्ट २०२४ पर्यंत दादर येथील काँग्रेस मुख्यालय टिळक भवन कार्यालयात पाठविण्याचे आवाहन काँग्रेसकडून करण्यात आले आहे.अमरावती विधानसभा मतदार संघातून डॉ. सुनिल देशमुख हे १९९९ आणि २००४ मध्ये काँग्रेसकडून तर २०१४ मध्ये भाजपकडून आमदार म्हणून विजयी झाले होते. त्यानंतर आतामाजी पालकमंत्री सुनिल देशमुख यांनी इच्छुक उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाच्या नियमानुसार पुन्हा अमरावती विधानसभा विधानसभेतून लढण्याची तयारी सुरु केल्याचे यावरून दिसून येते. तर दुसरीकडे माजीमहापौर विलास इंगोले यांनी इच्छुक उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. विलास इंगोले हे अमरावती महापालिकेची स्थापना झाल्यापासून म्हणजे १९९२ पासून सततनगरसेवक म्हणून सेवारत आहेत. तर १९९९ ते २००२ पर्यंत अमरावती मनपाचे महापौर म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच अमरावती विधानसभा निवडणूक एकदा अपक्ष तर दुसऱ्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढली होती. तर अलिम पटेल हे सुद्धा काँग्रेसचे कार्यकर्ते आहेत.या व्यतिरिक्त आज आणखी काही इच्छुक उमेदवार आपले अर्ज भरणार आहेत.

१० ऑगस्टपर्यंत अर्जाची मुदत

सर्वसाधारण वर्गातील उमेदवारांसाठी २० हजार रुपये तसेच अनुसूचित जाती, जमाती आणि महिला इच्छुक उमेदवारांना १० हजार रुपये पक्षनिधी अर्जासोबत भरावे लागणार आहेत. जिल्हा काँग्रेस कमिटीकडे जे इच्छुक उमेदवार अर्ज सादर करतील त्या जिल्हा कार्यालयाने १० ऑगस्टपर्यंत जमा झालेले सर्व अर्ज प्रदेश कार्यालयाला सादर करावेत. यामधून उमेदवार निश्चित केले जाणार आहे.

राजकीय हालचालींना वेग

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी बैठक

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई– राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी करण्यासाठी काँग्रेसने शुक्रवारी बैठक बोलावली आहे. पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल व राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत ही बैठक होत असून राज्यातील काँग्रेसचे आमदार, खासदार व पक्ष पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली १९ जुलैला सकाळी १० वाजता गरवारे क्लब येथे बैठक होईल.

त्याला राज्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी दोन वाजता प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय असलेल्या टिळक भवन येथे जिल्हाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, जिल्हा प्रभारी, खासदार, आमदार, आघाडी संघटनांचे प्रमुख यांची संयुक्त बैठक होईल.

या बैठकीत नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे विश्लेषण केले जाणार असून आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला जाणार आहे. विधान परिषद निवडणुकीतील काँग्रेस आमदारांच्या मतांच्या फाटाफुटीबद्दल या बैठकीत चर्चा होणार आहे. पक्षाच्या विरोधात मतदान करणाऱ्या आमदारांच्या विरोधात लवकरच कारवाई केली जाणार आहे.

सावंगा विठोबा नगरीत आषाढी गुरुपौर्णिमा निमित्त चंदन उटी कार्यक्रम

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चांदुर रेलवे– अमरावती जिल्हात चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दिनांक २१/७/२०२४ रविवारला दुपारी ४.०० वाजता संस्थानच्या वतीने आषाढी गुरुपौर्णिमा निमित्त चंदन – ऊटीचा कार्यक्रम आणि रात्री ८.०० वाजता अवधूत नाम प्रबोधनकार शामराव राठोड महाराज,सिदखेड ता.नेर(परसोपंत) जि.यवतमाळ यांचा महाराजांची गाथा ओवी क्र.१– उल्हासले मन, सोडली पंढरी या ओवीवर प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता महाप्रसाद कार्यक्रम संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात आयोजन करण्यात आले आहे.*

दि. २२/७/२०२४– सोमवार रोजी सकाळी



संस्थानमध्ये गुरु पुजन कार्यक्रम आयोजित करण्यात असून या कार्यक्रमात सर्व भाविक भक्तांनी सहभागी व्हावे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संस्थानमध्ये श्रावण मास निमित्त ३६ दिवस अखंड जागृती भजन (दिवसरात्र) मांडीचा शुभारंभ दि. ४/८/२०२४ रविवार पासून होत आहे. ज्या अवधूत भजन मंडळांना या मांडीमध्ये सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी संस्थानचे सचिव अशोक हरिदासजी सोनवाल (मोबा.क्र.९९२३७०२१०३) वर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.* *तरी सर्व भाविक– भक्तांनी तन–मन–धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील,वामण रामटेके,गोविंद राठोड,दिगांबर राठोड,अनिल बेलसरे,फुलसिंग राठोड,चरणदास कांडलकर,वैभव मानकर, स्वप्निल चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

महिलांच्या सशक्तीकरणासाठी 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना'

राज्यातील महिलांचे सशक्तीकरण व्हावे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे व महिलांवर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण आहारात सुधारणा करणे या सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे.

दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत. अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया ही विनामुल्य असल्या कारणाने महिलांनी कोणत्याही मध्यस्थामार्फत अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. अथवा कोणत्याही ठिकाणी अर्ज भरताना कोणतेही शुल्क देण्याची आवश्यकता नाही. महिलाचे आरोग्य व पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. परंतु, दरमहा आर्थिक लाभ देणारी योजना म्हणून तसेच कुटुंबात महिलांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी देखील ही योजना महत्वाची आहे.

ग्रामपंचायत , नगर पंचायत/परिषद व महानगर पालिका क्षेत्रात विभाग कार्यालय येथे पात्र महिलांना अर्ज देता येतील. याच बरोबर पोर्टल, मोबाइल पव्दारे, सेतू सुविधा केंद्राव्दारे ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ज्या महिलांना ऑनलाईन अर्ज करता येणे शक्य नसेल त्यांना ग्रामीण भागात महिला व बाल

विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, सेतू सुविधा केंद्र , आपले सरकार सेवा केंद्र, कॉमन सर्विस सेंटर, ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामसेवक यांच्याकडे तसेच नागरी भागात अंगणवाडी सेविका, मुख्य सेविका, वार्ड अधिकारी, सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, कॉमन सर्विस सेंटर्स मध्ये अर्ज ऑफलाईन पद्धतीने करता येतील.

योजनेचे स्वरूप: पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर) सक्षम बँक खात्यात दरमहा १ हजार ५०० रूपये इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र, राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १ हजार ५०० रूपये पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येईल.

योजनेच्या लाभार्थी: महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला योजनेच्या लाभासाठी पात्र असतील. २ लाख ५० हजार रुपये पेक्षा उत्पन्न असणाऱ्या महिला लाभासाठी पात्र असतील. २ लाख ५० हजार रुपये उत्पन्नाचा दाखला उपलब्ध नसेल मात्र कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड असेल त्यांनी उत्पन्नाच्या दाखला देण्याची आवश्यकता असणार नाही. १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या ४ पैकी कोणतेही ओळखपत्र अथवा प्रमाणपत्र असल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार आहेत.परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. या योजनेचा कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेलादेखील लाभ देण्यात येणार आहे.आवश्यक कागदपत्रे: योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्जाची प्रत, आधार कार्ड, बँक पासबुक, वयासाठी व रहिवाससाठी – जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला , पिवळे किंवा केशरी शिधापत्रिकेची सत्यप्रत, पासपोर्ट आकाराचा फोटो आणि योजनेच्या अटी व शर्ती पालन करण्याबाबतचे हमीपत्र इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता आहे.लाभार्थी निवड: ज्या लाभार्थ्यांस ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा अंगणवाडी केंद्र, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी) तसेच ग्रामपंचायत, वार्ड, सेतू सुविधा केंद्र येथे उपलब्ध करण्यात आली आहे.

– सतिश आनंदराव बगमारे,
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय,अमरावती

वरूड, शेंदुरजनाघाटमध्ये दमदार पाऊस

जिवना नदीला आला पूर –नाले,रस्ते झाले जलमय

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक वरुड– तालुक्यातील वरूड, शेंदुरजनाघाटसह जवळपासच्या काही खेड्याभागात आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर जवळपास दिड तास पावसाने दमदार हजेरी लावली. या पावसाच्या पाण्यामुळे परिसरातील नदी, नाले ओसांडून वाहायला लागले आहे.तर बळीराजाची दुबार पेरणीची चिंता हि मिटली आहे.

पावसाळा सुरू झाला तेव्हा पासून या भागातील नागरिकांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम असल्याचे वेळोवेळी दिसून येत होते. आजच्या दमदार पावसाने या प्रतीक्षेला आता पुर्णविराम लागल्याने शेतकर्यांच्या आशा पल्लवित

झाल्या आहे. आजुबाजुच्या संत्रा बागा असलेल्या शेतामध्ये तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. शेतातून पावसाचे पाणी वाहून निघाल्याने नदी नाले ओसांडून वाहत आहेत. शहरातील रस्त्यावर सर्वत्र पाणी साचल्याने रस्ते सुद्धा धुवून निघाले आहे.

शहरासह इतर भागात सर्वत्र पाणीच पाणी साचलेले दिसून आले. पावसाचा सर्वाधिक जोर मात्र तालुक्यातील वरूड, शें.घाट या दोन मोठ्या शहरांसह आजुबाजुच्या ग्रामीण क्षेत्रात पहायला मिळाला. सतत दिड तास सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पावसाचे पाणी शेतांमधून सुद्धा वाहुन निघाल्याने लहान मोठ्या नद्या ओसांडून वाहताना दिसल्या.

शें.घाट येथील जिवना नदीला पुराचे स्वरूप प्राप्त झाले होते. शे.घाट ते तिवसाघाट रस्त्यावरील नाल्याला पुर आल्याने या रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळित झाली. अन्य लहान, मोठ्या नाल्यांना पुर आल्याने त्या भागातील वाहतूकीचा खोळंबा झाला होता. पावसाच्या आगमन झाल्योन शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत.

नालवाडा परिसरात ढगफुटी

वेदर स्टेशनला नोंद ६ मिमी पावसाची

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – दर्यापूर तालुक्यातील नालवाडा व माटेगावात तीन दिवसांपूर्वी ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले. हे गाव ज्या महसूल मंडळात येते, त्या खल्लार मंडळातील वेदर स्टेशनवर त्या दिवशी फक्त सहा मिमी पावसाची नोंद झालेली आहे. त्यामुळे शेती पिकांच्या नुकसानासाठी पीक विमा व शासन मदतनिधी कसा मिळणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाळ्यात २४ तासांत ६५ मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्यावर अतिवृष्टी झाल्याचे गृहीत धरून महसूल व कृषी यंत्रणेद्वारा आदेशाची वाट न

पाहता नुकसानाचे सर्वेक्षण करण्यात येते. स्वयंचलित हवामान केंद्र असलेल्या भागात जर पाऊस पडल्यासच त्याची नोंद होईल. मात्र, त्या महसूल मंडळातील अन्य गावांत मुसळधार पाऊस झाल्यास त्याच्या नोंदी या वेदर स्टेशनवर होत नाहीत. त्यामुळे अन्य गावांत अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाल्यास बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचा परतावा, तसेच पिकांच्या नुकसानासाठी शासन मदत मिळणे महत्त्वाचे आहे; मात्र त्या दिवशी संबंधित खल्लार मंडळातील वेदर स्टेशनवर फक्त ६ मिमी पावसाची नोंद असल्याचे स्कायमेटच्या अहवालात आहे.नालवाडा, माटरगाव शिवारात पावसाने नुकसान झाले. येथे स्वत: भेट देऊन पाहणी केली. बाधित पिकांचे सर्व्हेक्षण करण्याचे निर्देश तलाठी व कृषी सहायकांना दिले आहेत. या पावसाची खल्लार वेदर स्टेशनला नोंद नाही. नुकसानाचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात येणार असल्याचे दर्यापूरचे तहसीलदार रवींद्र कानडजे यांनी सांगितले.

शेती पिकांचे मोठे नुकसान : पीकविम्यासह शासन मदत मिळणार की नाही?

गडगा नदीत अवैधपणे खोदले छोटे तलाव, पर्यावरणाला धोका –आदिवासींची फजिती

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक धारणी– मेळघाटची गंगा म्हणजे गडगा नदीत अज्ञात योजनेत अज्ञात विभागाने अज्ञात खोदकाम करुन नदीच्या प्राकृतिक स्वरुपात जिवघेणे बदल करुन पर्यावरणाला व सोबतच आदिवासींना धोका निर्माण केल्याने एकच खळबळ माजलेली आहे. सदर खोदकामाबाबततीत वनविभाग प्रादेशिक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, महसूल विभागाजवळ कोणतीच माहिती उपलब्ध नसल्याने मेळघाटात पूर्व नियोजित आर्थिक गैरप्रकाराचा नवा चेहरा उजेडात आलेला आहे.

धारणीपासून ११ कि. मी. अंतरावरील टोली आणि गडगा नदीपार वसलेल्या आकी तथा मांसूधावडी या तीन गावाच्या त्रिकोणी शिवारातून वाहणार्या गडगा नदीत ८ ते १० लहान–लहान तलाव खोदण्यात आल्याने एकच खळबळ माजलेली आहे. माहितीनुसार, दोन महिन्यांपूर्वी उन्हाळ्यात गडगा नदीत आयत आकाराचे तलाव सदृश्य खोदकामे ठिकठिकाणी करण्यात आलेली होती.

कोणत्या योजनेतून, कोणत्या शासकीय विभागाने, कोणत्या ठेकेदाराने व किती

रुपयाच्या अंदाजाद्वारे संरक्षित नदीत ब्लास्टिंग करुन पोकलॅन्डद्वारे गडगा नदीत तलावासाठी आयत आकाराचे खोदकाम करण्यात आले. हे गावकरी, ग्रामपंचायत, वनविभाग, महसूल विभाग, जि. प. अमरावती, जलसंधारण आणि तालुका कृषी अधिकारी यापैकी कोणालाच माहिती नाही. याशिवाय मोक्यावर कोणतेही माहितीचे फलक नाही. अत्यंत गोपनीय पद्धतीने खोदकाम करण्यात आले होते.

एका माहितीप्रमाणे, टोली गाव शिवारातील शेताच्या धुर्यावर जेसीबीने खोदकाम सुरू करण्यात आलेले होते. पण शेतकर्यांची संमती घेण्यात आलेली नव्हती म्हणून शेतमालकांनी काम करण्यास मनाई केली. नंतर चक्क नदीच्या पात्रात गैरपरवानगी आणि अशास्त्रीय पद्धतीने खोदकाम करण्यात आल्याचे समजते. पावसाळ्यात जेव्हा गडगा नदीला पूर येतो तेव्हा आदिवासी पुरात वाहून आलेल्या लाकूडफाट्याला एकत्रित करत असतात. हिवाळा व उन्हाळ्यात हेच इंधन म्हणून लाकूड ग्रामस्थांच्या कामी पडतात. आता नदीपात्रात खोदकाम झाल्याने त्यांना धोका आहे.

गडगाच्या वरच्या भागात प्रकल्प

नदी पात्रात ज्या ठिकाणी तलाव खोदण्यात आलेले आहे. त्या ठिकाणांपासून पूर्वदिशेने ६ कि. मी. अंतरावरील गडगा मध्यम प्रकल्पाच्या नावाने मोठा बांध बांधण्यात आलेला आहे. तब्बल बारा वर्षांपासून प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. मात्र, पाणी रोखण्यात आलेले नाही तर दुसरीकडे दोन वर्षांपासून कालव्यासाठी पाईप टाकणे सुद्धा सुरू आहे. गडगा मध्यम प्रकल्पामुळे ७० टक्के धारणी तालुका व्यापलेला असला तरी आता तापी मेगा रिचार्ज प्रोजेक्ट सुरू होण्याची तयारी आहे. एकूणच प्रकल्पाच्या नावावर उच्चस्तरीय गैरप्रकार सर्रास होत आहे. गडगा नदी ही अतिसंरक्षित नदी म्हणून चिन्हीत करण्यात आलेली असून व्याघ्र प्रकल्पाच्या तीन कि. मी. च्या आत नदीत अतांत्रिक पद्धतीने खोदकाम करण्यात आल्याने विस्तृत चौकशी होवून जबाबदार विभागाविरुद्ध कारवाई करण्याची गरज आहे.

२५ लाख झाडे देणारअमरावतीकरांना प्राणवायू!

वनविभागाचे नियोजन, जिल्ह्यात 'अमृत वृक्ष आपल्या दारी, एक पेड माँ के नाम' योजना

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– वनविभागाने नाव संकल्प हाती घेत 'अमृत वृक्ष आपल्या दारी' ही योजना राबवायला सुरुवात केली आहे. ३० सप्टेंबरपर्यंत योजनेत वनमहोत्सव घेण्यात येणार आहे. केंद्र शासनाने 'एक पेड माँ के नाम' योजनेचीही अमरावती जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. प्रादेशिक, सामाजिक वनीकरण या दोन्ही यंत्रणांच्या माध्यमातून २५ लाखांपेक्षा जास्त वृक्षलागवड केली जाणार आहे.

शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापनांना वृक्षारोपण उपक्रमासाठी वनमहोत्सवातून मोफत रोपे देण्यात येणार आहेत. या रोपांची लागवड करून भविष्यात आपापल्या परिसरात हिरवळ

निर्माण करण्याबरोबर निसर्ग संपन्न वातावरणाचा आनंद घेता येणार आहे. त्यासाठी वनविभागाने तयारी सुरू केली आहे. वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत, रिकाम्या जागेत वृक्षारोपण करावे, यासाठी शाळा, महाविद्यालयांनी मागणी केली आहे.

झाडांना वाढविण्याची जबाबदारी कोणाची?

वनविभागाकडून लागवड केल्यानंतर त्याची निगा राखणे, संगोपनाची जबाबदारी प्रादेशिक, सामाजिक वनीकरणच्या आरएफओंची असणार आहे

शासकीय आस्थापनांनी लागवड केल्यानंतर त्या विभागाचे प्रमुख आणि शाळा, महाविद्यालयात जबाबदारी स्वीकारलेल्या शिक्षक, प्राचार्य व प्राध्यापकांची राहणार आहे.

यंदा २५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट– वनविभागाच्या चांदूर रेल्वे, वडाळी, मोर्शी, परतवाडा, वरूड वनपरिक्षेत्रातील प्रादेशिक व सामाजिक वनीकरण विभागाने २५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. परतवाडा वनपरिक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात मेळघाटच्या पायथ्याजवळ वनक्षेत्र येते. आरएफओंना त्यांच्या कार्यक्षेत्रात वृक्षलागवडीचे टार्गेट दिले आहे.

कोणत्या विभागाला किती उद्दिष्ट?

कृषी विभाग : २५०००
रेशीम विकास विभाग : १३०००
सार्वजनिक बांधकाम विभाग : ३५०००
सहकार व पणन : १०५००
शालेय शिक्षण : ५००००
सामाजिक न्याय : १५०००

आभासी नफा दाखवून साडेसहा लाखांनी चुना

शेअर मार्केटमध्ये आभासी नफा दाखवून अमरावतीमध्ये तरुणाची फसवणूक

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– शेअर मार्केटमध्ये आभासी नफा दाखवून येथील एका तरुणाची ६.४७ लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आली. २६ मार्च ते १५ मेदरम्यान ती फसवणुकीची मालिका चालली. याप्रकरणी, रवी दुल्हानी (४०, रा. नवीवस्ती,बडनेरा) यांच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी १६ जुलै रोजी व्हॉट्सप ग्रुप युजर, सहा बँक खातेधारक अशा एकूण सात जणांविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

फिर्यादी दुल्हानी यांना २६ मार्च रोजी एका अनोळखी मोबाइल क्रमांकधारकाने एक लिंक पाठविली. त्या लिंकवर क्लिक करण्यास भाग पाडून आरोपींनी त्यांना शेअर मार्केटमध्ये ऑनलाइन गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. त्यासाठी त्यांचे रजिस्ट्रेशन करण्यात आले. आरोपींनी त्यांना शेअर ऑनलाइन ट्रेडिंग करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या बँकेच्या खात्यांमध्ये ऑनलाइन रक्कम ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. दुल्हानी यांनी एक्युआर वेल्थ ट्रेनिंग कॅम्प या पमध्ये ती गुंतवणूक केली. त्यांनी पाठविलेल्या एकूण ६ लाख ४७ हजार रुपयांवर नफा झाल्याचे दाखविले. परंतु, नफा म्हणून दाखविलेली रक्कम फिर्यादीला विड्रॉल करता येत नव्हती. तेव्हा त्यांना फसवणुकीची जाणीव झाली. त्यांनी १६ जुलै रोजी सायबर पोलीस ठाणे गाठले.

'नीट'ची पुनर्परीक्षा दिलीच नाही; तरीही मिळाली दुसरी गुणपत्रिका

६४० गुणांऐवजी मिळाले १७२ गुण, भूमिकाचे डॉक्टर होण्याचे स्वप्न भंगले

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ नॅशनल टेस्टिंग एजन्सीने घेतलेल्या वैद्यकीय प्रवेशाच्या नीट परीक्षेत झालेल्या महा घोटाळ्याचा फटका आर्णीतील एका विद्यार्थिनीला बसला आहे. या विद्यार्थिनीला नीटच्या पहिल्या परीक्षेत ७२० पैकी ६४० गुण मिळाले होते. मात्र दुसरी परीक्षा न देता तिचे गुण ६४० वरून १७२ वर घसरलेत, या प्रकारामुळे तिला प्रचंड धक्का बसला आहे. भूमिका राजेंद्र डांगे असे विद्यार्थिनीचे नाव आहे. या प्रकारात संतप्त वडिलांनी न्याय मिळण्याची मागणी केली आहे. डांगे कुटुंबाने भूमिकेला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न बघितले होते. यातून भूमिकाने गत महिन्यात वैद्यकीय प्रवेशाची नीट परीक्षा दिली होती. निकालही उत्तम लागला, भूमिकाला नीट परीक्षेत ६४० गुण मिळाले व ऑल इंडिया रँक ११ हजारावर होती.

आता डॉक्टर बनण्याचे स्वप्न सत्यात उतरणार एवढ्यातच नीट परीक्षेतील महागोटाळा भूमिकाच्या स्वप्नाच्या आड आला. दरम्यान दुसऱ्यांदा झालेल्या नीट परीक्षेत तीने परीक्षा दिलेली नसताना सुद्धा, गुणपत्रिकेत भूमिकाचे गुण ६४० वरून १७२ एवढे घसरले तर ऑल इंडिया रँक ११ हजारावरून ११ लाखांवर गेली. यामुळे भूमिकेला व तिच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. आर्णी शहरातील विद्यार्थिनीसोबतच झालेल्या या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांकडूनही प्रशासना विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तरी प्रशासनाने याप्रकारची निःपक्ष चौकशी करून भूमिकेला तातडीने न्याय मिळवून द्यावा अशी मागणी आता होत आहे.

> नव्याने गुणपत्रिका आली तेव्हा आम्हाला मोठा धक्का बसला. माझ्या मुलीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न भंगले. याविषयी आम्ही एनटीएला ईमेल पाठवला. पण त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे पुढे काय करावे हे आम्हाला समजत नाही. सरकारनेच आता या प्रकरणी आम्हाला मदत करावी व भूमिकाला न्याय मिळवून द्यावा. – **राजेंद्र डांगे**, भूमिकाचे वडील.

शासकीय रक्तपेढीने सहा महिन्यात १०३ बॉटल दूषित रक्त केले नष्ट

एचआयव्ही, हिपॅटायटीस बी, सी रुग्णांनी केले होते रक्तदान



> इर्विन येथे रक्त संकलित केल्यानंतर त्या रक्ताचे एचआयव्ही, मलेरिया, गुप्तरोग, हिपॅटायटिस–बी व सी या विषाणूंची चाचणी केली जाते. यामध्ये जे रक्त दूषित आढळले त्याची योग्य विल्हेवाट लावून सुरक्षित रक्तच रुग्णांना दिले जाते. सहा महिन्यांत १०३ बॉटल रक्त दूषित आढळले.
> – **डॉ. आशिष वाघमारे**, रक्तपेढी प्रमुख, इर्विन

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदान महत्त्वाचे आहे; परंतु रुग्णांना रक्त चढविण्यापूर्वी रक्त सुरक्षित आहे का, याची चाचणी केली जाते. जिल्ह्यातील शासकीय रक्तपेढीमध्ये सहा महिन्यांमध्ये ४ हजार ४०९ जणांनी रक्तदान केले. यामध्ये १०३ रक्तदात्यांचे रक्त हे दूषित आढळून आले आहे. यामध्ये ९ जणांना एचआयव्ही असल्याचे आढळून आले आहे. या सर्व दूषित रक्ताची वेळीच विल्हेवाट लावून ते नष्टदेखील करण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात वर्षभरात हजारो गरजू रुग्णांना रक्ताची गरज पडते. यामध्ये अपघातग्रस्त, गर्भवती महिला, सिकलसेल, थॅलेसेमिया, तसेच इतरही अनेक गरजू रुग्णांना रक्त आवश्यक असते. त्यामुळे रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे यासाठी जिल्ह्यात शासकीय रक्तपेढीबरोबरच काही खासगी रक्तपेढ्याही कार्यरत आहेत. इर्विन रुग्णालयातील रक्तपेढी ही जिल्ह्यातील एकमेव शासकीय रक्तपेढी आहे. या रक्तपेढीमधून जिल्ह्यातील सर्वच शासकीय रुग्णालयांमध्ये रक्तपुरवठा केला जातो. त्यामुळे या ठिकाणी रक्तदान केल्यानंतर ते रक्त सुरक्षित आहे का, याची चाचणी केली जाते आणि त्यानंतर सुरक्षित रक्त संबंधित रुग्णांना चढविले जाते. जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये इर्विन रक्तपेढीमध्ये ४ हजार ४०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात १०३ पिशव्या रक्त हे दूषित आढळून आले आहे.

या आजाराचे आहे दूषित रक्त

शासकीय रक्तपेढीमध्ये सहा महिन्यांत संकलित झालेल्या रक्ताच्या चाचणीमध्ये ०९ रक्तदात्यांचे रक्त हे एचआयव्ही पॉझिटिव्ह, १५ पिशव्या रक्त हे हिपॅटायटिस–बी, तर ७९ पिशव्या रक्त हे हिपॅटायटिस– सी विषाणू दूषित आढळून आले.

रक्तदान करताना घ्या काळजी?

रक्तदान करण्यापूर्वी रक्तदाता हा निरोगी आहे की नाही याची तपासणी करणे गरजेचे आहे. रक्तदाता जर रक्तदान करण्यापूर्वी काही दिवस आजारी असेल तर त्याने रक्तदान करणे टाळावे. रक्तदान केल्यानंतरही ते रक्त सुरक्षित आहे की नाही याची चाचणी करूनच संबंधित रुग्णांना द्यावे.

गौरी–गणपती उत्सवातही मिळणार 'आनंदाचा शिधा'

राज्यातील १ कोटी ७० लाख शिधापत्रिकाधारकांना मिळणार लाभ

१५ ऑगस्टपासून होणार वाटप सुरू

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती सन २०२४ च्या गौरी–गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी एक किलो या परिमाणात रवा, चना डाळ, साखर व १ लिटर सोयाबीन तेल या शिधाजिन्नसांचा समावेश असलेला 'आनंदाचा शिधा' प्रतिशिधापत्रिका १ शिधाजिन्नस वितरित करण्याचा निर्णय राज्याच्या पुरवठा विभागाने शुक्रवारी घेतला आहे.

राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ रेशन कार्डधारकांना त्याचा लाभ होणे अपेक्षित आहे. सणासुदीच्या काळात राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक, तसेच छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी

आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दरात खाद्यवस्तू उपलब्ध करून देण्याकरिता राज्यात सणसुदीच्या काळात आनंदाचा शिधा वितरित केला जात आहे. यापूर्वीदेखील विविध सणवार, जयंती समारंभानिमित्त रेशन कार्डधारकांना शंभर रुपयांत प्रतिसंच शिधा वितरित करण्यात आला. त्यास लाभार्थींचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर आगामी गौरी–गणपती उत्सवातदेखील आनंदाचा शिधा उपलब्ध केला जाणार आहे.

जिल्ह्याला आनंदाचा शिधा वितरित करण्याकरिता आवश्यक शिधाजिन्नस खरेदी करण्यासाठी ऑनलाइन पोर्टलवर निविदा नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांऐवजी ८ दिवसांच्या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.

> **१५ ऑगस्टपासून होणार वाटप सुरू**
> गौरी–गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी चार शिधाजिन्नस असलेला आनंदाचा शिधा प्रतिशिधापत्रिका १ शिधाजिन्नस संज १५ ऑगस्टपासून वाटप करण्यास सुरू होणार आहे. १५ सप्टेंबरपर्यंत त्याचे वितरण केले जाईल. या १ महिन्याच्या कालावधीत ई–पॉसप्रणालीद्वारे शंभर रुपये प्रतिसंच शिधा दिला जाईल.

शेगावात गण गण गणात बोतेचा गजर

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा : भूतलावरील वैकुंठ अशी ख्याती अन महिमा असलेल्या पंढरपूर नगरीला आषाढीची वारी करण्यासाठी जाण्याची लाखो भाविकांची मनस्वी इच्छा राहते. मात्र, विविध अडचणीमुळे तिथे जाऊ न शकणारे भाविक विदर्भपंढरी शेगाव नगरीत दाखल होतात. आजही शेगावी हेच चित्र होते. रस्ते, मंदिर परिसर, दर्शनबारी, पारायण स्थळ आबालवृद्ध भाविकांनी नुसते फुलले होते. यामुळे शेगावी पंढरपूर अवतरल्याचा सुखद प्रत्यय भाविकांना आला.

वार्धक्य, आजार, प्रापंचिक अडचणी, आर्थिक चणचण, शेतीची कामे अश्या एक न अनेक अडचणी उद्भवतात. त्यामुळे पंढरीची वारी चुकते. मात्र देवाच्या दर्शनाची आस लागलेल्या आणि मनोमनी रुखरुख लागलेले बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ मराठवाड्यातील आणि दूरवरचे भाविक शेगावकडे कूच करतात. गुरुमाऊली गजानन महाराजामध्ये विठू माऊलीचे रूप पाहणारे भाविक शेगावात दाखल होताच कृत्यकृत्य होतात. त्यांच्या मनाची रुखरुख, सल दूर होते. आज १७ तारखेला आलेल्या आषाढी एकादशीला शेगावात हेच चित्र, हिच भावना दिसून आली. पाऊणलाखाच्या आसपास भाविक संतनगरीत दाखल झाल्याचा अंदाज आहे. यापैकी

एक असलेल्या एका अंध गायकाने स्वतःच ढोलकी वाजवित या भाविकांच्या भावना आपल्या, 'गजानन बाबा द्या शांती मनाला, शेगावी आलो तुझ्या दर्शनाला' या अर्थपूर्ण भजनाद्वारे व्यक्त केल्या. त्याची भजने ऐकण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी जमली होती.

विठू माऊली, गण गण गणात बोतेचा गजर

आज शेगावात आषाढी एकादशी उत्सव पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. आज बुधवारी सकाळपासूनच शेगाव शहर भाविकांनी गजबजून गेले आहे. यात क्रमाक्रमाने वाढ होत गेली. मध्यान्ही मंदिर परिसर भावीकांनी गजबजून गेला होता. बस स्थानक, रेल्वे स्थानक ते गजानन महाराज संस्थान मंदिर मार्गावरील सर्व रस्ते भाविकांनी नुसते फुलून गेले होते. विठू माऊली आणि गण गणात बोतेच्या गजराने विदर्भ पंढरी दुमदुमली. संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. बुधवारी शेगावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आषाढीला होणारी मोठी गर्दी आणि पाऊणलाख भाविकांचा अंदाज लक्षात घेऊन मंगळवारी रात्रभर मंदिर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले. यामुळे बुधवारी दर्शनबारीवरील ताण आणि भाविकांची असुविधा कमी झाली. मात्र, तरीही प्रत्यक्ष दर्शनासाठी मुख दर्शनासाठी पाऊण एक तासाचा अवधी लागला.

आषाढीनिमित्त संतनगरी फुलली

जिल्ह्यातील ४२ ग्रामपंचायतींमधून क्षयरोग हद्दपार! निकष पूर्ण ग्रामपंचायतींचा गौरव

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – केंद्र सकारने येत्या २०२५ पर्यंत भारत हा क्षयरोगमुक्त करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. याचाच एक भाग म्हणून गावपातळीवर आरोग्य संस्था, उपकेंद्र, हेल्थ वेलनेस सेंटरचे कर्मचारी व अधिकारी तसेच संबंधित ग्रामपंचायतीच्या समन्वयातून क्षयरोग दूरीकरणासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. यानुसार या उपक्रमात जिल्ह्यातील ७० ग्रामपंचायतींची निवड केली होती. यापैकी टीबीमुक्तीचे निकष पूर्ण करणाऱ्या ४२ ग्रामपंचायतींनी उकृष्ट कार्य केले आहे. त्यामुळे या ४२ ग्रामपंचायत क्षेत्रातून क्षयरोग हद्दपार झाला आहे.

४२ ग्रामपंचायतींनी टीबीमुक्तीचे निकष पूर्ण करीत गावे टीबीमुक्त केली आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांच्या हस्ते सोमवारी येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रात आयोजित कार्यक्रमात ४२ गावांचे सरपंच, सचिव, पीएचसीचे वैद्यकीय अधिकारी आदींना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. क्षयरोगमुक्त भारत करण्यावर वरील ग्रामपंचायतींनी भर दिला तसाच इतरही ग्रामपंचायतींनी आपली

ग्रामपंचायत टीबीमुक्त होण्यासाठी उपाययोजना करण्यावर भर द्यावा, असे आवाहन याप्रसंगी जिल्हाधिकारी कटीयार यांनी केले.यावेळी सीईओ संजीता मोहपात्रा यांनी आपल्या मनोगतामध्ये क्षयमुक्त ग्रामपंचायती निर्माण करण्यासाठी गावपातळीवरील सरपंच, ग्रामसेवक, आशा स्वयंसेवका यांना निकषाप्रमाणे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन मोहपात्रा यांनी केले. प्रास्ताविक डीएचओ डॉ. सुरेश असोले यांनी केले. तर आभार जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड यांनी केले. कार्यक्रमाला टीएमओ, सरपंच, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ प्रयोगशाळा पर्यवेक्षक, औषधोपचार पर्यवेक्षक उपस्थित होते.

या आहेत टीबीमुक्त ग्रामपंचायती

वासणी खुर्द (अचलपूर), कठोरा गांधी, नया अकोला, (अमरावती) हयापूर, खिरगव्हाण (अंजनगाव सुर्जी), अळणगाव, अंचलवाडी, हरताळा, सायत (भातकुली) खराळा, लाखनवाडी (चांदूर बाजार) बासलापूर, सावंगी संगम (चांदूर रेल्वे), अवागढ, कोरडा, रायपूर,(चिखलदरा), कलमगव्हाण, रामगाव, शिंगणवाडी, तोंगलाबाद (दर्यापूर), आजनगाव, आसेगाव, बोरवाघल, कसारखेड, रायपूर कसारखेड, सोनेगाव खरडा, उसळगव्हाण, वाढोणा (धामणगाव रेल्वे), धारणमहू, रंगूबेली (धारणी), दुर्गवाडा, मैवाडी, पातूर (मोर्शी), अडगाव बुर्ख, जावरा (नांदगाव खंडेश्वर), भारवाडी, बोरडा, देहाणी, दिवाणखेड (तिवसा), बाभूळखेड, बेसखेडा, इसापूर (वरुड) अशा ४२ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

चांदूर बाजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला राज्य शासनाचा प्रथम पुरस्कार प्राप्त

आ. बच्चू कडू यांच्या पुढाकाराने संस्थेचा कायापालट

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते, त्यांना जर योग्य प्रशिक्षण मिळाले तर ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. हाच विचार करून मी या संस्थेच्या पायाभूत विकासापासून ते गुणवत्ता वाढीसाठी लक्ष दिले. संस्थेला राज्यशासनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. संस्थेच्या प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या कष्टाचे हे फळ आहे असे मत आमदार बच्चू कडु यांनी व्यक्त केले.

नावलौकिक मिळवणाऱ्या चांदूर बाजार येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला नुकताच राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचा वतीने राज्यातील उत्कृष्ट आउद्योगीक प्रशिक्षण संस्था हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आ. बच्चू कडू यांच्या पुढाकाराने कायापालट झालेल्या या संस्थेला हा बहुमान मिळाल्याबद्दल संस्थेच्या प्राचार्य, शिक्षक वृंद तथा कर्मचारी यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याच्या उद्देशाने १५ फेब्रुवारी १९९९ रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. सुरुवातीला वर्ग भरवण्यासाठी संस्थेकडे स्वतःची जागा नसल्याने तालुका खरेदी-विक्री संघाच्या गोदामाचा गाळा भाड्याने घेऊन हे वर्ग भरवण्यात येत होते. त्यावेळी सर्व कामकाज इथूनच चालत असल्याने सहा शाखांच्या विद्यार्थ्यांना एकत्रित प्रशिक्षण घेण्यामध्ये अनेक अडचणी होत्या. बच्चू कडू यांनी आमदार झाल्यानंतर या विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय आणि त्यांची शिक्षण घेण्याची जिज्ञासा लक्षात घेऊन प्रथमतः संस्थेसाठी प्रशासकीय इमारत व इतर सोयीसुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यानंतर त्यांच्याच माध्यमातून रामभाऊ मारोतरावजी काकडे यांनी संस्थेची इमारत बांधण्यासाठी आपली दीड एकर जागा दान दिली. २०११ मध्ये संस्थेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. पुढे संस्थेच्या दुसऱ्या मजल्याच्या कामासाठीही आ. बच्चू कडू यानी निधी उपलब्ध करून दिला. संस्थेला नवीन इमारत व सर्व सोयीसुविधा उपलब्ध झाल्याने परिणामी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा तंत्रशिक्षणाकडे कल वाढला.आ. बच्चू कडू यांच्या पुढाकाराने कायापालट झालेल्या या संस्थेकडे आज स्वतःची प्रशस्त इमारत, ऑफिस, १२ वर्गखोल्या, स्वतंत्र वर्कशॉप, भांडारगृह, तसेच इतर विभागाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी सात विविध ट्रेडच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जात असून सोळा तुकड्यांमध्ये जवळपास तीनशे विद्यार्थी दरवर्षी प्रशिक्षण घेत आहेत. संस्थेकडे सोळा शिक्षकांसह चौदा जणांचा कार्यालयीन व इतर कर्मचारी वर्ग आहे.

आ. बच्चू कडू यांच्या माध्यमातून याठिकाणी अजून एक नाविन्यपूर्ण संकल्पना राबविली जात आहे. स्मार्ट कॉम्प्युटर लॅब'च्या माध्यमातून इथले विद्यार्थी केवळ महाराष्ट्रातीलच नाही, तर संपूर्ण देशभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांशी जोडले गेले आहेत. त्यामुळे ग्रामीण भगत असूनही त्यांना देशातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करता येऊ लागले आहे. एकंदरीत आ. बच्चू कडू यांनी या संस्थेकडे विशेष लक्ष देऊन केलेल्या कायापालटामुळे आज ही संस्था राज्यात सर्वोत्कृष्ट ठरली आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या कुटुंबात शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख भाऊसाहेबांच्या विचारांनी या छोट्या संस्थेचे वटवृक्षात रूपांतर करण्यामध्ये आ. बच्चू कडू यांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे असे मत यावेळी लोक व्यक्त करत आहेत.

अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यासाठी आंदोलन करण्याची धमकी देणाऱ्यांवर कारवाईची मागणी

प्लॉटधारकांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

मौजे तलाई ता. धारणी येथील सर्व्हे नं. ३५ब च्या मूळ मालकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी सौरभ कटियार व पोलीस अधीक्षक विशाल आंनद यांना निवेदन दिले असून त्यात त्यांनी आरोप केला आहे की, शेख बशीर शेख लाल, शेख समीर शेख बशीर, शेख अकील शेख बशीर, शेख अमीन शेख बशीर, शेख तमीज शेख बशीर, रहिवासी आहेत. धारणी, शेख अन्वर शेख अतीक, सर्व रहिवासी धारणी हे खोट्या अफवा पसरवून पोलीस प्रशासनाची दिशाभूल करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्लॉट वरील सर्व कागदपत्रे आमच्याकडे आहेत, आम्ही त्याचे मूळ मालक आहोत पण हे लोक आमच्यावर दबाव आणून आमच्याकडे पैशांची मागणी करत आहेत. आणि जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत.

सध्या परिस्थिती अशी आहे की, सर्व कागदपत्रे असूनही आम्हाला आमच्या जागेवर बांधकाम करण्यापासून रोखले जात आहे, याप्रकरणी आम्ही धारणी पोलिसांकडे तक्रार केल्याने ते नाराज झाले असून त्यांनी आता आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला आहे , हे लोक कायद्याचे रक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करून आम्हाला जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत, प्लॉटधारकांवर अनेकवेळा कारवाईची मागणी केली असली तरी कारवाई होत नसल्याने त्यांचे मनोबल उंचावले आहे अशा लोकांवर कारवाई करावी, अशी मागणीही प्लॉटधारकांनी केली आहे. या वेळी मोहम्मद याकूब मोहम्मद अमीन मार्कानी जितेंद्र रमेश मालवीय, मोहम्मद अमीर अब्दुल रझाक, प्रतीक हौसीलाल मालवीय, जामा मशिदीच्या अध्यक्ष शकीनाबानो मोहम्मद युसूफ, मोहम्मद. इद्रिस मो.इक्बाल, फातिमा जाहिद सैफी शेख अस्लम शेर इस्माईल, ए. शरीफ मणियार मो.अनिस मो. जिकर, शब्बीर खा, सिकंदर खा, किशोर रामलाल राठोड, ए. राजिक मोहम्मद, रफिक, दिनेश भगवानदास जैस्वाल, दीपक मंगलाल मलय्या, सय्यद अक्रम सय्यद इब्राहिम, शशिकला राजेंद्र भागवत, मोहम्मद. शारिक मोहम्मद रफिक सलीम इब्राहिम सैफी उपस्थित होते.

जम्मू कश्मीर येथील खुल्या राष्ट्रीय योगा स्पर्धेत अमरावतीच्या राजपूत दाम्पत्याला सिल्वर व ब्राँझ पदक

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने जम्मू कश्मीर येथे आयोजित केलेल्या खुल्या राष्ट्रीय योगा स्पर्धेत अमरावतीच्या राजपूत दाम्पत्याने सिल्व्हर आणि ब्राँझ पदक पटकाविले.या स्पर्धेत देश विदेशातील योग पटूंनी सहभाग नोंदविला होता. अमरावती येथील आरोग्यम् धन योग क्लासच्या योग शिक्षिका डॉ.मेघा ठाकरे यांच्या योग कक्षेतील डॉ. प्रतिभा राजपूत व डॉ. चंदनसिंह राजपूत यांनी हे उभयंता पदकाचे मानकरी ठरले आहेत. २४ आणि २५ जून रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने जम्मू कश्मीर येथे आयोजित केलेल्या खुल्या राष्ट्रीय योगा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.विविध वयोगटात ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.५५+ या वयोगटात झालेल्या स्पर्धेत डॉ. प्रतिभा राजपूत व डॉ.चंदनसिंह राजपूत यांनी उत्तम योग प्रात्यक्षिके सादर करून या स्पर्धेत यशस्वी कामगिरी केली.यामध्ये डॉ. प्रतिभा राजपूत यांनी ब्राँझ तर डॉ. चंदनसिंह राजपूत यांनी सिल्वर पदक प्राप्त केले.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने उभयंतांचा पदक बहाल करून सन्मान करण्यात आला. नुकताच राजपूत दाम्पत्याचा आरोग्य टीमच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी योग शिक्षिका डॉ.मेघा ठाकरे ,शितल घुटे, उज्वला ताथोडे, कीर्ती तायडे,रोहिणी काकड ,मनीषा कावळे,शितल जामकर ,रिता वानखडे, मीनल काकड ,उज्वला चव्हाण, योगिता नानोटकर, निशा राठी ,कविता गतफने, नीलिमा वाटोळे, शेळके काकू, स्नेहा शेळके, सुषमा बगाडे, कल्याणी, भाग्यश्री यांचेसह आदी सदस्य उपस्थित होते.

तपोवन प्रभागात ८५ लक्ष निधीतील विकास कामांच्या भूमिपूजनाचा धडाका

डॉक्टर कॉलनी, गौरव नगर, योगीराज नगर, कृष्ण नगर येथील विकास कामांचे आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते भूमिपूजन

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील तपोवन प्रभागात ८५ लक्ष निधीतील विकास कामांचे भूमिपूजन आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. या अंतर्गत तपोवन भागातील डॉक्टर कॉलनी येथे २० लक्ष निधीतून नालीचे बांधकाम, गौरव नगर येथील ओपन स्पेसमध्ये ७.९९ लक्ष निधीतून पेव्हिंग ब्लॉक बसविणे , योगीराज नगर येथे २० लक्ष निधीतून नालीचे बांधकाम , तसेच मौजे म्हसला नजीकच्या कृष्ण नगर नगर येथे खुल्या जागेला १६.१५ लक्ष निधीतून चेनलिंग फेन्सिंग करणे, रामानंद रेसिडेन्सी मुख्य रस्त्याच्या बाजूला ११.९८ लक्ष निधीतून नालीचे बांधकाम करणे तसेच सम्राट कॉलनी येथे ८.३७ नालीचे बांधकाम व सी.डी वर्क चे बांधकाम करण्यात येणार आहे. आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी कुदळ मारीत व नामफलकाचे अनावरण करून यासर्व

विकासकामांच्या भूमिपूजनाचा धडाका लावला.

विकासाच्या संकल्पनेत मूलभूत विकास व मानवविकास असे दोन पैलू असतात. आजच्या आधुनिक युगात नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सुसज्ज रस्ते, मुबलक व नियमित पाणी पुरवठा, वीज, सौंदर्यीकरण , सांडपाण्याची व्यवस्था आदींची पूर्तता होणे जरुरीचे आहे. तर समाजाचे प्रश्न निकाली काढून विविध लाभांच्या व कल्याणकारी योजनांची पूर्तता करून मानव विकास सुद्धा करणे गरजेचे आहे. हाच विकासाचा नियोजित कृती आराखडा प्रत्यक्षात साकारण्यासाठी आपला प्रयत्न असून मागील चार वर्षात विकास कामांची मालिका राबविण्यावर आपला भर राहिला आहे. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता शहरी क्षेत्रात पायाभूत सुविधांची उपलब्धी करतांना जनसामान्यांच्या समस्यांचे तत्परतेने निराकरण करण्यासह नागरिकांना अपेक्षित विकास कार्यक्रम राबविण्याचे धोरण सुद्धा अवलंबिल्या जात आहे. शहर सौंदर्यीकरणाची कामे गतीने पूर्ण होत असतांना त्यात सर्वसामान्य जनतेची मिळणारी साथ मोलाची व नवी ऊर्जा देणारी ठरत आहे. जनतेचा आशीर्वाद असाच पाठीशी राहिला तर अमरावतीचा कायापालट होवून शहराचा चेहरा -मोहरा बदलण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केला. दरम्यान आमदार महोदयांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. आगामी काळात या समस्यांचे निराकरण करण्यास आपले सर्वोतोपरी प्राधान्य राहणार असल्याचा विश्वास आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला.तपोवन परिसरात लोकवस्ती झपाट्याने वाढत असून रहिवासी भागात मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने स्थानिक भागातील नागरिकांना प्रचंड दुरावस्थेला व अडचणींना सामोरे जावे लागत होते. या संदर्भात नागरिकांनी निवेदन देऊन अवगत केले असता आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी तात्काळ दखल घेत मूलभूत सुविधांची कामे मार्गी लावली. याबद्दल स्थानिक नागरिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली . गेल्या अनेक वर्षांपासून विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या तपोवन भागात आता रस्ते बांधकाम, सांडपाण्याची योग्य व्यवस्था, सौंदर्यीकरण सारख्या पायाभूत सुविधांची विकास कामे करण्यात येणार असून प्रभागाचा चेहरा मोहरा बदलून विकासाचे पर्व नांदणार आहे. यावेळी यश खोडके यांचे समवेत तपोवन भागातील डॉक्टर कॉलनी , गौरव नगर, योगीराज नगर , कृष्ण नगर , रामानंद रेसिडेन्सी आदी भागातील नागरिक व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

एस.टी.वाहकांची तीन वर्षे वेतनवाढ रोखण्याच्या निर्णयाला वाहकांचा विरोध

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर

एसटी महामंडळाच्या बसेसमध्ये प्रवासी विनातिकीट सापडल्यास वाहकांची तीन वर्षे वेतनवाढ रोखली जाणार आहे. या निर्णयाला वाहकांनी कडाडून विरोध केला असून तसे पत्र व्यवस्थापकीय संचालकांना पाठवले आहे.

एसटीमध्ये वाहक प्रवाशांना तिकीट घेण्याचे वारंवार आवाहन करतात. परंतु, त्यानंतरही गर्दीचा फायदा घेत काही प्रवासी जाणीवपूर्वक तिकीट घेण्याचे टाळतात. काही प्रवासी लहान मुलांना मांडीवर घेऊन वय कमी सांगतात. अशावेळी तिकीट तपासणी पथकाला कुणी प्रवासी विनातिकीट आढळल्यास २०१८ पर्यंत ५० रुपये दंड ते जास्तीत जास्त ३ वर्षे वेतनवाढ रोखण्याची तरतूद करण्यात आली होती. ही शिक्षा प्रकरणाच्या गांभीर्यानुसार चौकशीनंतर सक्षम अधिकारी निश्चित करत होते. त्यामुळे आर्थिक देवाणघेवाण नसलेल्या वाहकांना ५० रुपये ते ५००

रुपयापर्यंत दंड व्हायचा. जाणीवपूर्वक तिकीट न देणाऱ्या वाहकाची १ वर्षे ते तीन वर्षांपर्यंत वेतनवाढ थांबवली जात होती.परंतु, ३१ डिसेंबर २०१९ मध्ये महामंडळाने एसटी बसमध्ये विनातिकीट प्रवासी सापडल्यास वाहकाची सरसकट ५ वर्षे वेतनवाढ रोखण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे वाहकांमध्ये असंतोष वाढला. त्यामुळे १५ दिवसांपूर्वी एसटीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी हा कालावधी कमी करून ३ वर्षे केला. तरीही वाहकांचा संताप कमी झालेला नाही. आधीच वेतन कमी असताना आमची आर्थिक कोंडी कशाला करता,? असा प्रश्न उपस्थित करणारे निवेदन व्यवस्थापकीय संचालकांना पाठवले जात आहे. या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेत्यांच्या कार्यालयासह इतर संबंधित विभागाला पाठवली जात आहे. याबाबत एसटी महामंडळाचे महाव्यवस्थापक (कामगार व औद्योगिक संबंध) मोहनदास भरसट यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी, माहिती हवी असल्यास स्थानिक विभाग नियंत्रकांशी बोला. गंभीर प्रश्न असल्यास ते मुख्यालयाला पाठवतील. त्यानंतर उत्तर देऊ, असे सांगितले.

एसटी महामंडळात सुमारे ३७ हजार वाहक

एसटी महामंडळात सुमारे ३७ हजार वाहक, ३७ हजार चालकांसह विविध संवर्गातील वर्ग १ ते चार पर्यंतचे ८० हजाराहून जास्त कर्मचारी- अधिकारी कार्यरत आहे. हे सगळे अधिकारी- कर्मचारी प्रवाश्यांना चोगल्या सेवा देण्यासाठी प्रयत्न करत असतात.

पूर्णा नदी पात्रात बुडालेल्या इसमाचा १० मिनिट मध्ये शोध

दि.१८विदर्भ प्रजासत्ताकचांदुर बाजार

चांदुर बाजार तालुक्यात येत असलेल्या थुगाव पिंपरी येथे पूर्णा नदी पात्रात थुगाव येथील रहिवासी शिवराम सावलकर (५५) हे दुपारी एक वाजता बुडल्याची प्राथमिक माहिती तहसील प्रशासनाला मिळाली त्याआधारे तहसील प्रशासनाकडून जिल्हा बचाव पथक यांना आमंत्रित करण्यात आले. जिल्हा बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले असता त्यांनी अवघ्या दहा मिनिटात बुडालेल्या इसमाचा मृतदेह शोधून काढला.नदी ही दोन नद्यांचा संगम बनून वाहत असते. तालुक्यातील काजळी देऊरवाडा येथे पूर्णा नदी आणि मेघा नदीचा संगम होऊन ते सोमर थुगाव पिंपरी गावाकडून तिकडे वाहत असते. सध्या दोन्ही नद्या वाहत असून मेघा नदीला मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. तर नद्याचे झालेल्या खोलीकरणामुळे पाण्याचा अंदाजअचूक येत नसल्याने कोणीही नदीपात्रात जाऊ नये असे सूचना तहसील प्रशासनाकडून देण्यात आले. घटनास्थळी,चांदूरबाजार तहसील ते तहसीलदार ऋणय चकुलवार तसेच मंडळ अधिकारी तलाठी कोतवाल उपस्थित होते.

यांना कोण? आवर घालणार.....

विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळख असलेल्या चिखलदर्याचे सौंदर्य सध्या पडत असलेल्या पावसामुळे अधिकच बहरले आहे.त्यामुळे पर्यटकांची मोठी गर्दी सध्या चिखलदर्यात आहे अश्यातचपर्यटकांची जीवघेणी स्टंटबाजी या ठिकाणी सुरू आहे 'ज्या' पॉईंटवर प्रवेश नाही तिथेही पर्यटकांचा फोटोशूट करून जीवघेण्या रील तयार करीत आहे .त्यामुळे अश्या पर्यटकांना आवरणार कोण?असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

'महावाचन उत्सव - २०२४' हा उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविणार

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन : इयत्ता ३ री ते १२वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश

शिक्षकदिनी होणार पारितोषिक वितरण

सहभागी विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकाचा सारांश देणारा एका मिनिटाचा व्हिडीओ किंवा ऑडीओ क्लिप महावाचन उत्सव-२०२४' च्या पोर्टलवर अपलोड करतील. या उपक्रमासाठी तालुका, जिल्हा, शैक्षणिक विभाग व राज्य स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावरील विद्यार्थ्यांस पारितोषिक मिळणार आहे. या उपक्रमाचे राज्यस्तरीय पारितोषिक वितरण ५ सप्टेंबर या राष्ट्रीय शिक्षक दिना च्या प्रसंगी करण्यात येणार आहे.

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण प्रमाण बरे असल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केली नंतर पावसाने दांडी मारली.एकीकडे निसर्ग वाकुल्या दाखवत आहे तर दुसरीकडे वन्य जीव नासाडी करत आहे.चांगले उत्पन्न व्हावे या हेतूने शेतकाऱ्यांनी चांगले नामांकित कंपनी चें बियाणे विकत आणले,पेरणी केल्यावर वन्यजीव बियाणे व अंकुर ची नासधूस करत आहे.त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

विद्यार्थ्यांसाठी वाचन महोत्सव २०२४ या उपक्रमाचे २२ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत होऊन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडली जावी आणि दर्जेदार साहित्याचा, लेखक व कवींचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व भाषा संवाद कौशल्याला चालना मिळावी, यासाठी शासनातर्फे इयत्ता ३री ते १२वीच्या सत्र २०२४-२५ या वर्षात महावाचन उत्सव - २०२४ हा उपक्रम रीड इंडिया सेलिब्रेशन यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात येणार आहे.

वाचन केल्याने तणाव कमी होतो आणि मेंदूला आराम मिळतो. तसेच वाचनामुळे व्यक्तीला आत्मविश्वास आणि आत्मसाक्षात्कार होतो. म्हणूनच वाचन ही एक उपयुक्त व आवश्यकउपयुक्त क्रिया आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शैक्षणिक राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाकरिता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून निवड करण्यात आली आहे. यासाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, इयत्ता सहावी ते आठवी आणि इयत्ता नववी ते बारावी अशा तीन इयत्तानिहाय वर्गवारी निश्चित करण्यात आल्या आहेत.

उपक्रमांतर्गत विद्यार्थी त्याच्या आवडीनुसार, इच्छेनुसार मराठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त साहित्य विश्वातील नावाजलेल्या साहित्यिकांचे विविध साहित्य, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्र इत्यादी साहित्याची निवड करून वाचन करतील.

सर्व सहभागी विद्यार्थी वाचन केलेल्या पुस्तकावर विचार करतील व तो विचार लिखित स्वरुपात महावाचन उत्सव २०२४ च्या महापोर्टलवर उपलब्ध करतील.

वन्य प्राण्याकडून कोवळ्या अंकुराची नासाडी : वन्य प्राण्यांच्या बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा

तालुक्यात सरासरी पेक्षा पावसाचे प्रमाण कामी असून जवळपास ऐंशी टक्के पेरण्या पूर्णत्वास आल्या आहेत.पेरण्या झाल्या आणि नव्याने अंकुर निघत असतांना रांनडूक्कर व इतर प्राणी नवीन अंकुरला उकरून त्याची नासाडी करत आहे त्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे.तर काही गावात

नव्याने दुबार पेरण्या कराव्या लागत आहेत.वनविभागाने वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. टाकरखेडा, चिखलपाट, तलाई, खाऱ्या, सोनाबर्डी, चाटवाबोड धरनमोह, केकदाबोड,या परिसरात वन्यजिवांनी उन्माद घातला आहे.सुरवातीला पावसाचे

> पेरणी केल्यावर कोवळे अंकुर व काही ठिकाणी अंकुर निघायच्या आधीच वन्य प्राण्यानी फस्त केले.त्यामुळे दुबार पेरणी करावी लागली.
>
> **मदनसिंग चव्हाण**
> **शेतकरी टाकरखेडा**

पंधराशे रुपयात महिलांची बोळवण करण्यापेक्षा सन्मानजनक रक्कम द्या : ॲड. यशोमती ठाकूर

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

राज्यातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण योजना आणून पंधराशे रुपयात महिलांची बोळवण केली आहे, तर सुशिक्षित तरुणांना मात्र सहा ते बारा हजार रुपये दिले जाणार आहेत. निवडणुकांपूर्वी महिलांची फसवणूक करण्यापेक्षा महिलांनाही सन्मान जनक रक्कम द्यावी अशी मागणी माजी मंत्री आणि आमदार ड यशोमती ठाकूर यांनी केली आहे.

राज्य सरकारने राज्यातील महिलांसाठी नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा पंधराशे रुपये देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. तर आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सुशिक्षित तरुणांना कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत दरमहा सहा ते बारा हजार रुपये देण्यात येणार आहेत. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सहा हजार रुपये कार्य प्रशिक्षणा दरम्यान तर पदविका झालेल्या तरुणांना आठ हजार आणि पदवीधर तरुणांना कार्य प्रशिक्षणा दरम्यान दहा हजार रुपये देण्यात येणार आहेत.एकीकडे लाडक्या भावाला दहा हजार रुपये देण्याचा सरकारचा निर्णय आणि दुसरीकडे लाडक्या बहिणीची मात्र दीड हजार रुपयात सरकार फसवणूक करत आहे. यामध्ये लाडक्या भावा-बहिणींमध्येच भांडण लावायचा सरकारचा प्रयत्न असल्याचा दिसत आहे असा आरोपही ड.ठाकूर यांनी यावेळी केला.

महिलांनाही सन्मान जनक रक्कम द्या

दरम्यान राज्यातील सुशिक्षित महिलांनाही सरकारने लाडक्या भावाच्या योजनेप्रमाणे सन्मान जनक रक्कम दिली पाहिजे. किंवा राज्यातील महिलांना सरसकट पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम सरकारने देऊन महिलांचा सन्मान करावा अशी मागणी ड. यशोमती ठाकूर यांनी केली आहे. राज्यातील महिला भगिनींची जर सरकारला खरोखरच काळजी असेल तर त्यांनी महिलांची दीड हजार रुपयात फसवणूक न करता त्यांना किमान पाच हजार रुपये सन्मानपूर्वक द्यावेत, अशी कळकळीची विनंती आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करीत आहोत असेही ड.ठाकूर म्हणाल्या.

व्यसनाधीन मुलाने जन्मदात्या वडिलांना जिवंत जाळले

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अकोला :

जन्मदात्या वडिलांनाच नराधम मुलाने जिवंत जाळल्याचा धक्कादायक प्रकार जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील लोटणापूर येथे घडला. दारू पिऊन आलेल्या मुलाने खाटेवर आजारी असलेल्या वडिलांशी वाद घातला. रागाच्या भरात आजारी वडिलांनाच आग लावली. अर्धांगवायूच्या झटक्यामुळे आजारी वडील स्वत:चा बचाव करू शकले नाही. गंभीररित्या भाजल्या गेलेल्या वडिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी बाळापूर पोलिसांनी बुधवारी आरोपी मुलावर हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

कलंकित मुलाची घटना बाळापूर तालुक्यातून समोर आली. आपल्या जन्मदात्या आजारी वडिलांविषयी कुठलीही सहानुभूती न बाळगता नराधम मुलाने त्यांना जिवंत जाळले. धनेगाव येथील अजाबराव बापूसा इंगळे (५५) हे पत्नी व तीन मुलांसह मोलमजुरी करून लोटणापूरमध्ये भाड्याच्या खोलीत राहत होते. काही दिवसांपूर्वी अजाबराव यांना अर्धांगवायूचा झटका आला. त्यामुळे ते गंभीर आजारी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू होते. घरात ते खाटेवरच पडून राहत होते. १४ जुलै रोजी दुपारी त्यांचा दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा आकाश अजाबराव इंगळे (३०) हा घरात दारू पिऊन आला. आजारी वडिलांसोबत व्यसनाधीन मुलाचा वाद झाला. दोघांमधील वाद टोकाला गेला. व्यसनाधीन मुलाने रागाच्या भरात घरातील पेटलेल्या चुलीतील आग आजारी वडिलांच्या खाटेला खालून लावली. वडिलांना त्या आगीच्या झळांमध्ये सोडून देत तो घरातून निघून गेला. खाटेवरील कपड्यांमुळे आग भडकली. आजारपणामुळे शरीराची हालचाल करता येत नव्हती. त्यातच मदतीसाठी घरात कुणीच नसल्याने ते आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. या आगीमध्ये ते गंभीररित्या भाजल्या गेले.

नीट परीक्षेतील घोळा संदर्भात युवक काँग्रेस आक्रमक जिल्हाधिकारी कार्यालयावर केली निदर्शने

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

शिक्षण क्षेत्रात भाजपा सरकारने विद्यार्थ्याचे भविष्य धोक्यात आणेलेले आहे. गेल्या ७ वर्षात ७० पेपरफुटीचे प्रकरण समोर आलेले आहे. NEET परीक्षे संदर्भात फार मोठा घोटाळा उघडकीस आलेला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय नेते . खा. राहुलजी गांधी यांनी संसदेत हा मुद्दा एक हाती धरून ठेवलेला आहे व उचित चौकशी करून कडक कार्यवाहीची मागणी केलेली आहे. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे कुणाल राऊत यांच्या निर्देशानुसार अमरावती शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने NEET परीक्षा घोटाळ्या विरोधात आज निषेध प्रदर्शन करण्यात आली . तसेच नीट परीक्षा घोटाळ्याची योग्य चौकशी करून दोशींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी अमरावती शहर जिल्हा युवक काँग्रेसची मागणी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून अमरावती शहर जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन आहे की त्यांनी NEET परीक्षा पुन्हा घेण्यात यावी ही मागणी मुख्यमंत्र्यापर्यंत पोहोचवावी अशी ईच्छा आहे. गेल्या सात वर्षात ७० पेपर फुटीचा अमरावती शहर जिल्हा काँग्रेस तिव्र शब्दात निषेध करण्यात आला.

वैयक्तिक लाभ योजना पावसाळ्यात २८ हजार मजुरांच्या हाताला काम

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून भर पावसाळ्यात जिल्हाभरात ४,२३३ कामे सुरू आहेत. याद्वारे सद्यःस्थितीत २७,५६६ मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. वैयक्तिक लाभाच्या योजनेसह वृक्षलागवड, फळबाग लागवड, रोपवाटिका, घरकुलाची कामे होत असल्याने दिलासा मिळाला आहे.

ग्रामपंचायतस्तरावर कामाची हमी देणारी ही योजना ठरली आहे. गतवर्षी दरदिवशी २७३ रुपये, तर यंदा २९७ रुपये अशी मजुरी या कामांवर मिळत आहे. पावसाळ्यात मजुरांची संख्या रोडावली असली तरी कामाच्या शोधात स्थलांतरित होण्याची वेळ मजूरवर्गावर येणार नाही, अशी एकूण स्थिती आहे. ग्रामपंचायतीकडे नमुना अर्जाद्वारे कामाची मागणी व नोंदणी केल्यावर संबंधित व्यक्तीच्या हाताला पंचायत समितीद्वारे काम मिळत आहे. या योजनेच्या माध्यमातून जॉब कार्डधारक व्यक्तीला केंद्र शासनाच्या वतीने १०० दिवस, तर राज्य शासनाच्या वतीने १६५ असे एकूण ३६५ दिवस म्हणजेच वर्षभर कामाची हमी मिळत आहे. या योजनेद्वारे वैयक्तिक लाभाच्या योजनेद्वारे कुटुंबातील सदस्यांनाच इतरही मजुरांना कामे मिळत आहेत.

तालुकानिहाय सुरू असलेली कामे

सद्यःस्थितीत अचलपूर तालुक्यात ६१७, अमरावती १२६, अंजनगाव सुर्जी ८४, भातकुली १६४, चांदूर रेल्वे १४४, चांदूरबाजार ३७६, चिखलदरा ७९३, दर्यापूर १८७, धामणगाव १३८, धारणी ४२४, मोर्शी ५३८, नांदगाव १४८, तिवसा २१३ व वरुड तालुक्यात २९१ कामे सुरू आहेत.

चिखलदरा, मोर्शी तालुक्यात सर्वाधिक मजूर

अचलपूर १९९२, चांदूर रेल्वे १०१३, अंजनगाव सुर्जी ५८४, अमरावती ८४०, भातकुली ६३८, चांदूरबाजार १९९६, चिखलदरा ६०५१, दर्यापूर ९०३, धामणगाव ६२८, धारणी ३०९१, मोर्शी ५४९९, तिवसा १५००, नांदगाव खंडेश्वर ५६१ व वरुड तालुक्यात २,२७० हातांना काम मिळाले आहे.

स्वच्छता कंत्राटदारांना २० जुलैची डेडलाइन, अन्यथा 'ब्लॅकलिस्ट'

महापालिका उपायुक्तांनी कामकाज सांभाळताच दिल्या नोटीस : कंत्राट रद्द करण्याचा दिला इशारा

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती

शहरात दैनंदिन स्वच्छतेची कामे करारनाम्यानुसार होत नसल्याने प्रभागामध्ये अस्वच्छता कायम आहे. नाल्याची साफसफाई व्यवस्थित होत नसल्याचे निरीक्षण नोंदवून आपण आपल्या कामामध्ये २० जुलैपर्यंत योग्य सुधारणा करणे बंधनकारक आहे, अशी नोटीस महापालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी मंगळवारी पाचही प्रभागातील कंत्राटदार संस्थेच्या अध्यक्ष, सचिवांना बजावली आहे.

साफसफाई होत नसल्यामुळे साथरोग, कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही, असे निरीक्षणदेखील त्यांनी नोंदविले आहे. उपायुक्त प्रशासन म्हणून जबाबदारी येताच मडावी यांनी सोमवारी दुपारी स्वच्छता विभाग प्रमुखांसह अधीक्षक व निरीक्षकांची बैठक घेत स्वच्छता विभागाचा आढावा घेतला. तर मंगळवारी भर पावसात शहरातील विविध भागांची पाहणी केली. त्या पाहणीदरम्यान नोंदविलेल्या निरीक्षणाअंती त्यांनी मंगळवारी सायंकाळी पाचही झोनमधील

स्वच्छता कंत्राटदारांना नोटीस बजावली. नोटीसमधील नऊ मुद्द्यांवर त्वरित कार्यवाही करावी. ती न झाल्यास आपले कंत्राट रद्द करून आपल्या संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात येईल, असा इशारा नोटीसमधून देण्यात आला आहे.

ट्रॅक्टरने करा फवारणी

प्रभागामध्ये डास निर्मूलन मोहिमेकरिता कामगार अपुरे पडत असल्यामुळे प्रत्येक झोननिहाय पाण्याच्या टाकीसह एक नवीन ट्रॅक्टर कंत्राटदाराने खरेदी करावा व त्याद्वारे जंतुनाशक फवारणी करावी. दैनंदिन साफसफाई करण्याकरिता लावण्यात आलेल्या कामगारांना गणवेश, ओळखपत्र तसेच स्वयं सुरक्षा साहित्य किट त्वरित पुरवठा करावी व ते वापरण्यास कामगारांना बंधनकारक करावे.

१०० कामगार लावा

दैनंदिन साफसफाईकरिता झोननिहाय प्रत्येक प्रभागामध्ये १०० कामगार लावावेत. त्यांच्याकडून दैनंदिन साफसफाई, नाल्या काढणे, घराघरातून कचरा संकलित करण्यासह डास निर्मूलन मोहीम राबवावी. प्रभागातील सर्वत्र पडलेला कचरा त्वरित उचलून घ्यावा. प्रभागातील सर्व नाल्या बॉटमपासून साफ करण्यात याव्यात. प्रभागामध्ये जागोजागी पडलेल्या कचऱ्यावर तसेच नाल्यातील गाळ काढण्यात आलेल्या मलम्यावर जंतुनाशक फवारणी करण्यात यावी.

जीपीएस फोटो दररोज बंधनकारक

कामगारांची हजेरी जीपीएस फोटोने न घेतल्यास देयक अदा करण्यात येणार नाही. प्रत्येक घरी घंटागाडीद्वारे १०० टक्के कचरा संकलन आवश्यक आहे. कामगारांची हजेरी सकाळी सहा ते ६:३० वाजेपर्यंत घेण्यात यावी. सकाळी हजेरीच्या ठिकाणी जास्त वेळ न थांबवता त्यांची हजेरी रजिस्टरमध्ये नोंद घेऊन त्यांना त्वरित कामावर पाठविण्यात यावे, असे निर्देश दिले.